सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ३ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जिल्ह्यांच्या नामांतरप्रकरणी सुप्रीम कोर्टाकडून राज्य सरकारला दिलासा!

### नामांतराचा हक्क राज्य सरकारचा म्हणत विरोधकांची याचिका फेटाळली

नवी दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून उस्मानाबाद आणि औरंगाबाद जिल्ह्यांचे नामांतर अनुक्रमे धाराशिव आणि संभाजीनगर करण्याचा मुद्दा चर्चेत आहे. राज्य सरकारने या जिल्ह्यांचे नामांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. ही याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावली आहे. नामांतर करण्याचा हक्क राज्य सरकारकडे असून त्यात हस्तक्षेप करु नये, असं कोर्टाने याचिकाकर्त्यांना म्हटलं आहे. त्यामुळे राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्य सरकारने उस्मानाबादचे नामांतर 'धाराशिव' तर औरंगाबादचे नामांतर 'छत्रपती संभाजीनगर' करण्याचा निर्णय घेतला होता. त्याविरोधात दाखल झालेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली होती. राज्य सरकारने घेतलेला निर्णय योग्य असल्याचं कोर्टाने म्हटलं होतं. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात याचिकाकर्त्यांनी सुप्रीम कोर्टात अपील केलं. मात्र, सुप्रीम कोर्टानेही ही याचिका फेटाळून लावली.

निव्वळ राजकीय हेतूनेच हा निर्णय घेण्यात आल्याचे या याचिकेमध्ये म्हटले होते. यावर सुप्रीम कोर्टात आज सुनावणी झाली. यामध्ये कोर्टाने स्पष्ट केले की, नाव देण्याचा आणि बदलण्याचा अधिकार कायद्याने दिलेला आहे. जेव्हा नाव देण्याचे अधिकार असतात तेव्हा नामांतर करण्याचे सुद्धा अधिकार असतात. नाव बदलले की काही लोक समर्थनार्थ आणि विरोधात असणारच. त्यामुळे राज्य सरकारच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास कोर्टाने नकार दिला आहे व संबंधित याचिका फेटाळली आहे.

## लाडकी बहीण योजनेला स्थगिती देण्यास हायकोर्टाचा नकार; ६ सप्टेंबरला पुढील सुनावणी

मुंबई, २ ऑगस्ट : महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं आहे. या याचिकेवर तात्काळ सुनावणी करावी, सोबतच योजनेला स्थगिती द्यावी, अशी विनंती करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने सदर विनंती फेटाळून लावत स्थगिती देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. यावर पुढील सुनावणी मंगळवारी (६ सप्टेंबर) होणार आहे.

नवी मुंबईतील चार्टर्ड अकाऊंटट नावेद मुल्ला यांनी वकील ओवैस पेचकर यांच्यामार्फत ही जनहित याचिका दाखल केली आहे. लाडकी बहिण योजना म्हणजे सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे. त्यामुळे १४ ऑगस्टला सरकारी तिजोरीतून जाणाऱ्या पहिल्या हफ्त्याला तात्काळ स्थगिती देण्यात यावी अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे. त्यावर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या समोर आज सुनावणी झाली. मात्र सदर योजनेला तातडीची स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. उलट याचिकेवर तात्काळ सुनावणी करण्याची एवढी घाई का? असा सवाल न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या वकिलाला केला आहे. यावेळी लाडकी बहीण योजना ही तर करदात्यांच्या पैश्याचा अपव्यय आहे. त्यामुळे तिजोरीवर आर्थिक भार पडत आहे, असा दावा याचिकाकर्त्याच्या वकिलांनी केला.

याचिकाकर्त्याचे वकील ड. ओवैस पेचकर यांनी यावेळी माध्यमांशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव आणि आगामी विधानसभा निवडणुकांना डोळ्यासमोर ठेवून ही योजना आणण्यात आली आहे. या योजनेमुळे ४६०० कोटी रुपयांचा बोजा सरकारवर पडणार आहे. तर लाडका भाऊ योजनेमुळे १० हजार कोटींचा अतिरिक्त बोजा राज्य सरकारवर पडेल. राज्य सरकारवर आधीच ७.८० लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना देखील करदात्यांच्या जीवावरती राज्य सरकार असल्या योजना आणत आहे. आम्ही देशाच्या विकासासाठी कर भरतो, अशा योजनांसाठी नाही, असं ड. ओवैस पेचकर म्हणाले.

## आपदग्रस्त शेतीपीकासह घरांचे तात्काळ पंचनामे करा : आ. भीमराव केराम यांच्या तहसीलदाराना सूचना

तभा वृत्तसेवा
किनवट, २ ऑगस्ट -



मागील आठ दहा दिवसापासून किनवट तालुक्यात पावसाचे थैमान सुरु आहे. काही महसुली मंडळात तर वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होऊन खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. या पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली. या नुकसानीची तात्काळ दखल घेत आमदार भीमराव केराम यांनी किनवट व माहूरच्या तहसीलदाराला पत्र देऊन नुकसान बाधित शेती क्षेत्रासह पडझड झालेल्या घरांचे पंचनामे करून आपत्तकालीन सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना केल्या आहेत.

गेल्या आठदहा दिवसापासून किनवट शहरासह तालुक्यात जोरदार पाऊस बरसत आहे. काही महसुली मंडळात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत तर अनेक घरांची पडझड झाली आहे. यासंदर्भात नुकसान बाधित शेतकऱ्यांना तसेच पडझड झालेल्या कुटुंबीयांना शासनाचे अर्थसहाय्य मिळवून देण्याच्या हेतूने आमदार भीमराव केराम यांनी किनवट व माहूरच्या तहसीलदाराना नुकतेच पत्र दिले असून आपतग्रस्त शेतीक्षेत्रातील पिकांची तसेच पडझडं झालेल्या घरांची महसूल व कृषी कर्मचाऱ्यामार्फत प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत तसेच आपत्कालीन सर्वतोपरी शासनमदत पुरविण्यासाठी तातडीने आवश्यक ती कारवाई करावी अशा सूचना आमदार भीमराव केराम यांनी केल्या आहेत.

## कोल्हापुरात पुराच्या पाण्यात ८ जण गेले वाहून

कोल्हापूर : राज्यात पावसाने जोर धरल्यामुळे अनेक दुर्घटना सातत्याने समोर येत आहेत. त्यातच आता कोल्हापुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. कोल्हापुरात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गावांना पुराच्या पाण्याने वेढा घातल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. अशातच शिरोळ तालुक्यात पुराच्या पाण्यात ट्रॅक्टर उलटून मोठी दुर्घटना घडली. ट्रॅक्टरमधील ८ जण वाहून गेले आहेत. यापैकी तिघांना वाचवण्यात यश आलं आहे तर इतर ५ जणांचा शोध सुरु आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापुरात पावसामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. पंचगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून अनेक गावांना पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे.

## महसूल पंढरवड्यानिमित्त अधिकारी,कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर संपन्न

### महसुली सेवा सर्वसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवा - प्रभारी जिल्हाधिकारी आशिष येरेकर

अहमदनगर दि. १ ऑगस्ट :- जिल्ह्यात १ ते १५ ऑगस्ट, २०२४ दरम्यान महसूल पंधरवडा राबविण्यात येत असुन या पंधरवड्यात महसुल विभागाच्या सेवा अधिक प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश प्रभारी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्ह्यात १ ते १५ ऑगस्ट,२०२४ दरम्यान महसूल पंधरवडा राबविण्यात येत असुन त्यानिमित्ताने महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर संपन्न झाले. त्यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी श्री येरेकर बोलत होते.



यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) रामदास जगताप, तहसीलदार शरद घोरपडे, सुशील बेल्हेकर, सचिन डोंगरे योगेश शिंदे, जिल्हा रुग्णालयाचे अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ. टावरे, व्यसनमुक्तीचे डॉ. हर्षल पठारे, रक्तपेढीचे डॉ. खान, अवयवदानचे श्री. अहिरे, रक्त तपासणी पथकाचे डॉ. राजेश यादव यांच्यासह महसूल अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

येरेकर म्हणाले की, महसुल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. सर्वसामान्यांचा महसुल विभागाशी सर्वाधिक संबंध येतो. सर्वसामान्यांना सेवा पुरवत असताना अनेकवेळा महसुल अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये मानसिक तणाव निर्माण होतो. शासकीय कर्तव्य बजावत असताना प्रत्येक अधिकारी,कर्मचाऱ्याचे आपले स्वास्थ चांगले राहील याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) रामदास जगताप यांनी आरोग्य तपासणी शिबीर आयोजनामागची भूमिका विषद केली.

या शिबिरात रक्तदान केलेल्या उपजिल्हाधिकारी (रोहयो) रामदास जगताप, तहसीलदार (सर्वसाधारण) शरद घोरपडे, मन्सूर पठाण, अनुराग हातमोडे, श्रीमती वरलक्ष्मी रामदीन यांचा तर अवयव दान करण्यासाठी नाव नोंदणी केलेल्या श्रीमती. वंदना नेटके, श्रीमती अश्विनी ननावरे यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

१५० महसुल अधिकारी, कर्मचाऱ्यांचा शिबीरात सहभाग

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शिबीरामध्ये १०२ महसुल अधिकारी,कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी रक्त तपासणी मध्ये एलएफटी- लिव्हर टेस्ट, आरएफटी-किडनी टेस्ट, टीएफटीऋ - थायरॉईड टेस्ट, ऋ रक्तातील चरबी प्रमाण तपासणी, कर्करोग व ट्युमर मेकर तपासणी, सर्वसाधारण शुगर लेव्हल आदी तपासण्या करण्यात आल्या. सहा कर्मचाऱ्यांनी अवयवदान करण्याचा निश्चय करून ऑनलाईन नोंदणी केली तर ३१ पिशव्या रक्तदानही करण्यात आले.

## मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेसाठी ७ लक्ष महिलांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त

### प्राप्त अर्जाच्या छानणीसाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना, प्रभारी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची छानणी कक्षास भेट

अहमदनगर दि. १ ऑगस्ट :- महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य व पोषणात सुधारणा होण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजना सुरु केली आहे. जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असुन आजपर्यंत ७ लक्ष महिला लाभार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन भरुन घेण्यात आले असल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

अहमदनगर जिल्ह्यात मुख्यमंत्री-लाडकी बहिण योजनेची गतीने अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा परिदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसीय विशेष मोहिम राबविण्यात आली. तसेच या मोहिमेचा दैनंदिन आढावा, तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केलेल्या सुनियोजन कामामुळे ७ लक्ष महिलांचे अर्ज भरुन घेण्यात यश प्राप्त झाले आहे.

प्राप्त अर्जाच्या छानणीसाठी विशेष मोहिम

स्वतंत्र छाननी कक्षाची स्थापना

मुख्यमंत्री-लाडकी बहिण योजनेसाठी प्राप्त झालेल्या महिलांच्या अर्जाची छाननी जलदगतीने व्हावी यादृष्टीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुकास्तरावर तहसिलदार, गटविकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली स्वतंत्र कक्ष सुरु करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार तालुकास्तरावर स्वतंत्र अशा छाननी कक्षाची स्थापना करण्यात आली असुन दोन-तीन शिफ्टमध्ये सर्व कर्मचारी या कक्षातुन अर्जांच्या छाननीचे काम युद्धपातळीवर करत आहेत.



छाननी कक्षास प्रभारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट

मुख्यमंत्री-लाडकी बहिण योजनेसाठी प्राप्त झालेल्या महिलांच्या अर्जाची छाननीसाठी स्वतंत्रपणे सुरु केलेल्या अहमदनगर तालुक्यातील छाननी कक्षास प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी प्रत्यक्ष भेट देत पहाणी केली. या योजनेंतर्गत आजपर्यंत एकुण ४३ हजार ७११ पात्र लाभार्थ्यांना पोर्टलवर मान्यता देण्यात आली असुन या योजनेचा अधिकाधिक लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे श्री येरेकर यांनी आवाहन केले आहे. तसेच योजनेशी संबंधित सर्व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी योजनेचा लाभ प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही त्यांनी केले असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.




## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाने रचला विक्रम; रुग्णांच्या मदतीसाठी ३०० कोटींहून अर्थसहाय्य वितरित

### ३६,००० हुन अधिक गंभीर रुग्णांचे वाचले प्राण (एकूण ३६,१८२), मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या संवेदनशीलतेचा पुन्हा प्रत्यय

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, दि.२ ऑगस्ट : मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता महाराष्ट्र राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. गोरगरीब - गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत असल्याने मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी दिले आहेत.







यानुसार आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने गेल्या २ वर्षे १ महिन्यामध्ये ३६,००० पेक्षा अधिक गोरगरीब -गरजू रुग्णांना एकूण ३०१ कोटी रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे.

श्री एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारताच महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद पडलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष तात्काळ सुरू केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या मंगेश नरसिंह चिवटे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करून मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांनी या कक्षाची जबाबदारी दिली होती. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता मदत मिळवण्यासाठी मंत्रालयात जाण्याची ही गरज नाही पूर्णपणे ऑनलाईन प्रोसेस करून वैद्यकीय मदत मिळणार असल्याचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी सांगितले. यासाठी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळविता येईल.

संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मध्ये अनेक-विविध आजारांचा समावेश देखील करण्यात आला असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी दिली आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी , कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलियर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे. दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी केले आहे.

### अवघ्या एक वर्षाची दुवा बनली मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची ब्रॅण्ड अँबेसडर

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या ब्रॅण्ड म्बेसडर पदी अवघ्या एक वर्षाच्या दुवा नावाच्या चिमुकलीची निवड करण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील फहरीण मकुबाई आणि सादिक मकूबाई या मुस्लिम दांपत्याच्या पोटी जन्माला आलेल्या अवघ्या १३ दिवसांच्या बाळाचे प्राण मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या लाखमोलाच्या मदतीमुळे वाचले होते. दरम्यान सहा महिन्यानंतर कोल्हापूर येथे झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमात सदर मुस्लिम दांपत्याने संवेदनशील मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या हातात बाळाला सुपूर्द करत मुख्यमंत्री महोदय यांच्या दुवामुळे बाळाचे प्राण वाचले असल्याने या चिमुकलीचे नाव दुवा ठेवणार असल्याची इच्छा प्रकट केली. तब्बल एक लाख लोकांच्या साक्षीने मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी या बाळाला हातात घेऊन सदरच चिमुकलीचे नाव दुवा ठेवत असल्याचे जाहीर केले.



## दिव्याग बंधू भगिनींनी आंदोलन सहभागी व्हावे

फर्दापूर दि २ दिव्यांगांच्या हक्काच्या मागण्यासाठी दि.५ ऑगस्ट सोमवार सकाळी ११ वाजता महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मा.मदनकुमार इंगळे यांच्या नेतृत्वात विभागीय आयुक्त कार्यालयासमोर छत्रपती संभाजीनगर येथे जन आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.या जन आंदोलनाच्या माध्यमातून दिव्यांगाच्या हक्काच्या मागण्या विभागीय आयुक्तांकडे मांडणार आहोत.यामध्ये प्रामुख्याने दिव्यांग बांधवांसाठी सरकारने मोफत घर बांधुन द्यावे, मुलांना मोफत शिक्षण देऊन शासकीय नोकरीत समाविष्ट करून घ्यावे,संजय गांधी निराधार योजनेचे दहा हजार रुपये देण्यात यावे,वीज मोफत देण्यात यावी,गॅस मोफत देण्यात यावे,वैद्यकिय खर्च दरमहा पंधरा हजार रुपये देण्यात यावा अशा प्रमुख मागण्या आहेत.या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण हे जन आंदोलन करत आहोत.तरी जास्तीत जास्त संख्येने दिव्यांग बांधवांनी उपस्थित रहावे,असे आवाहन योगेश कृष्णा महाकाळ (दिव्यांग तालुका अध्यक्ष,सोयगाव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट) यांनी केली आहे.

## कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल येथे लोकमान्य टिळक व लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



सोयगाव,दि.२ ऑगस्ट : कै.बाबूरावजी काळे मराठी स्कूल मध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली शाळेच्या आवारात कै.बाबूरावजी काळे मराठी स्कूल येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. दादासाहेब पवार,उपमुख्याध्यापक सागर घाटे यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमात शाळेच्या एकुण २३ विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.तसेच विद्यार्थ्यांना शाळेच्या शिक्षिका शितल पवार व मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक यांच्या जीवनातील गोष्टी सांगितल्या व विद्यार्थ्यांनी त्या आत्मसात करावी असे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात शाळेच्या शिक्षिका मनिषा पाटील,शितल काटोले,रोहीणी पाटील,अंजली कथलकर,शितल पवार,निकीता देशमुख,आशा पंडित, नम्रता पाटील,शितल गावांडे,प्रेरणा मोरे,जयश्री श्रीवास्तव, नलीनी पाटील,किर्ती पाटील,शहादत्ता तडवी,संजय डापके आदी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सम्रुध्दी देशमुख व ज्योती गव्हांडे यांनी केले तर आभार कोमल पाटील हीने मानले.

## मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप



बिडकीन दि २ ऑगस्ट मराठा आंदोलक , संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त पैठण तालुक्यातील बिडकीन येथे आनंदेश्वरी सेवाभावी संस्थेच्या वतीने एच.पी.एल. विद्यालयातील सर्व समाजातील गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी लोकनेते विनायकराव मेटे सहकारी सुत गिरणीचे अध्यक्ष विजय शेजूळ , मोतीराम जाधव , स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्थेचे सचिव सचिन हाडे , ज्ञानेश्वर औटी , शाळेची प्राचार्य संभाजी जाधव , किरण गुजर , सामाजिक बबन काळे , आकाश हाडे , किशोर शिंदे , सुरेश मोतिंगे , अरविंद शेजुळ , पार्थ फासाटे , कुणाल जाधव , तुषार हाडे , मंदार आगाज , रोहित निनाळे, अशोक बोबडे, आदींसह एच.पि.एल.विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## भगवती विद्यालय मध्ये लोकशाही लोकमान्य टिळक पुण्यतिथी व आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात



बिडकीन दि १ऑगस्ट पैठण तालुक्यांतील बिडकीन येथील भगवती विद्यालयाबिडकीन येथे आज दि १ ऑगस्ट रोजी क्रांतिवीर लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उसाहत साजरी करण्यात आली शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ राशिनकर यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले,या कार्यक्रमाचे अध्यक्ष रायभान रकटे होते या प्रसंगी विद्यालया मध्ये भाषण स्पर्धेत ४७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. प्रमुख पाहुणे वअध्यक्ष यांनी महामानवाच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचल श्रीधर जऱ्हाड यांनी केले तर आभार प्रदर्शन रामनाथ धनवे यानी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खुशाला चव्हाण,अप्पासाहेब किसवे, विश्रान्ती सलगरे, सुभाष राठोड, अशोक डूबे, आशुतोष झारगड, सुनील पवार यांनी सहकार्य केले.

## रियलमी चा १३ प्रो सिरीज ५जी सह रियलमी वॉच एस २ आणि रियलमी बड्स टी३१० दाखल

छत्रपती संभाजीनगर, १ ऑगस्ट : भारतीय तरुणांमध्ये सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमी ने आज रियलमी १३ प्रो सिरीज ५जी, रियलमी वॉच एस२ आणि रियलमी बड्स टी३१० आपल्या स्मार्टफोन आणि एआयओटी पोर्टफोलिओमध्ये सादर केले. रियलमी १३ प्रो मालिका ५जी दोन मॉडेल रियलमी १३ प्रो सिरीज ५जी आणि रियलमी १३ प्रो ५जी सह येत आहे. यात एआय, अल्ट्रा क्लिअर कॅमेरा सारखी वैशिष्ट्ये आहेत आणि त्याची रचना इंप्रेशनिझमचे महान मास्टर क्लॉड मोनेट यांच्यापासून प्रेरित आहे. यात अत्याधुनिक कॅमेरा तंत्रज्ञान आहे.

## 'श्रीमद् रामायण' मालिकेत भगवान श्रीराम आणि लंकाधीश रावण यांचा होणार आमना-सामना

छत्रपती संभाजीनगर – सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील 'श्रीमद् रामायण' या भव्य दिव्य मालिकेत भगवान श्रीराम (सुजय रेऊ) आणि लंकाधिपती रावण (निकितीन धीर) यांच्यातील युद्ध एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचले आहे, कारण लक्ष्मणाने (बसंत भट्ट) इंद्रजीत (ऋषिराज पवार)चा वध केला आहे. आपल्या पुत्राचा अचेतन देह पाहून रावण उद्ध्वस्त झाला आहे आणि श्रीरामाविरुद्ध अंतिम युद्ध करण्यास तो सज्ज झाला आहे. युद्धावर जाण्यापूर्वी आपल्या मुलाच्या मृत्यूने पिसाटलेला रावण, श्रीरामावर विजय मिळवण्याच्या लालसेने आणखी शक्ती प्राप्त करण्यासाठी शिव पूजा आरंभतो.

दरम्यान, श्रीराम देखील शक्ती उपासना करतात आणि महागौरीला आवाहन करतात, रावणाच्या ताकदीवर विजय मिळवण्यासाठी तिच्याकडून मार्गदर्शन आणि शक्तीचे वरदान मागतात. अशा प्रकारे सुष्ट आणि दुष्ट यांच्यातील महासंग्रामाचे रणशिंग फुंकले आहे आणि दोन्ही पक्ष सुसज्ज आहेत. सध्याच्या कथानकाबाबत श्रीरामाची भूमिका करणारा अभिनेता सुजय रेऊ म्हणतो, कथानकाने तिव्रतेची परिसीमा गाठली आहे.

# फर्दापूर जवळ ठाणा परिसरात कपाशीवर मर रोगाचा प्रादुर्भाव

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २ ठाणा शिवारात शेतातील खरीप हंगामात लागवड केलेल्या कपाशी पिकांवर मर रोगाच्या प्रादुर्भाव झाल्याने पिके अचानक सुकू लागली आहे.त्यामुळे आता शेतकऱ्यांसमोर एक नवीन संकट उभे राहिल्याने शेतकरी तूर्तास हतबल झाला आहे.संबधित पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

ठाणा शिवारातील शेतकरी शालिक नरोटे गट नं.८६,बाजीराव नरोटे गट नं.८६,माणिक नरोटे गट नं.८४,अबरार सय्यद गट.नं ५९ या शेतकऱ्यांच्या शेतातील उभे कपाशीचे पिक मर रोगाच्या प्रादुर्भावामुळे अचानक सुकू लागल्याने नवीन संकट ओढवले आहे.कपाशीचे पीक हे इतर पिकांपेक्षा खर्चिक असल्याने शेतकऱ्यांनी आतापर्यंत पिकांवर महागडी कीटकनाशके,रासायनिक खतांच्या माध्यमातून हजारो रुपये खर्च केले आहे.एवढा खर्च लावून जर अश्या प्रकारे उभे पिक सुकू लागल्याने शेतकरी हतबल झाला आहे.कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.



**ठाणा शिवारातील नुकसानग्रस्त शेतात जाऊन मी प्रत्यक्षात पाहणी केली आहे.कपाशी पिकांवर आकस्मिक मर रोगाचा प्रादुर्भाव झाला असून शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीला ऑनलाईन तक्रार करावी.**
**–बी.चौरे (कृषी सहाय्यक)**

**हाताशी आलेले कपाशीचे उभे पीक डोळ्यासमोर अचानक अश्या प्रकारे सुकू लागल्याने आम्ही ठाणा शिवारातील शेतकरी हतबल झालो आहे.कृषी विभागाने आमच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची आमची मागणी आहे.**
**–शालिक नरोटे,नुकसानग्रस्त शेतकरी**

## झन्नामन्ना खेळणाऱ्या ६ जुगाऱ्यांवर कारवाई

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२ :- पैठण शहरातील गोपालनगर भागात पैसे लावून बावन्न पत्यांचा झन्नामन्ना जुगार खेळणाऱ्या आणि खेळवनाऱ्या ६ जुगाऱ्यांवर पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई जुगार कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून जुगाऱ्यांकडून हजारोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोपालनगर भागात काही मंडळी बावन्न पत्यांचा जुगार चालवत असून याठिकाणी मोठया प्रमाणावर जुगार चालत असल्याची गोपनीय खबर पैठण पोलिसांना मिळताच याठिकाणी पोलीस निरीक्षक किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने धाड टाकून जुगाराचे साहित्य व रोखरकमेसह नवाज पठाण, अय्युब पठाण, शिवा भवर, नवाब शहा, विठ्ठल नवले, सचिन मोटकर या ६ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले आहे.यातील अय्युब पठाण याच्यावर पोलिसात याआधी जवळपास ११ गुन्हे दाखल आहेत. जुगाऱ्यांवर मुंबई जुगार कायद्यानुसार कारवाई करण्यात आले असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल माळी करत आहेत.

## बिडकीन येथील रविंद्र गायकवाड यांना समाज गौरव पुरस्काराने सन्मानित

तभा वृत्तसेवा

बिडकिन दि २ऑगस्ट लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त सकल मातंग समाज बहुउद्देशीय संस्था पैठण यांच्या वतीने रविंद्र साहेबराव गायकवाड, बिडकीन यांना दि १ ऑगस्ट रोजी समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



यावेळी सकल मातंग समाज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रमेश नवगिरे, उपाध्यक्ष भिमा नवगिरे, सचिव विलास नवगिरे, पोलिस निरीक्षक देशमुख यांच्या हस्ते समाज गौरव पुरस्कार देण्यात आला.यावेळी रमेश शिंदे, अविनाश मिसाळ, नामदेव शरणागत,भरत मोघे,शिवा घोरपडे आदींसह सकल मातंग समाज संघर्ष समिती यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

## सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात आर.ओ.वॉटर फिल्टर व हॉलीबॉल, कबड्डी क्रिडांगणाचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.०२ ऑगस्ट - शहरातील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे होणारे विविध आजार टाळण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड या संस्थेतर्फे शहरातील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय येथे आर.ओ.वॉटर फिल्टरचे बुधवार रोजी बसवण्यात आले. तसेच विद्यार्थांच्या शारीरिक विकासासाठी हॉलीबॉल व



कबड्डी च्या क्रिडांगणाचे उदघाटन करण्यात आले.या प्रसंगी विद्यालयातील माजी विद्यार्थीनी गायत्री दिलीप मुठ्ठे हिची नुकतीच सहाय्यक स्थापत्य अभियंता या पदावर छत्रपती संभाजीनगर विभागात जलसंपदा विभागात निवड झाल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार व संचालक मंडळाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला . याप्रसंगी संस्थेचे सचिव अशोक आण्णा आहेर,कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख,शालेय समितीचे अध्यक्ष बाबासाहेब मोहिते,डॉ.ए.के.महाले, आप्पासाहेब देशमुख,कृष्णाराव पाटील,विशाल आहेर,मुख्याध्यापक संजय जाधव,कार्यालयीन अधीक्षक विलास पवार,पर्यवेक्षिका सुनिता दळवी, प्रा. विजय भोसले, क्रीडा शिक्षक अजित खंबाट यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## तालुक्यातील तरुणांच्या हाताला रोजगार मिळालाच पाहिजे – मनोज पवार

तभा वृत्तसेवा

कन्नड :- तालुक्यातील तरूणांच्या हाताला उद्योग मिळावा, सुशिक्षित तरुणांच्या हाताला रोजगार निर्माण झाला पाहिजे दि.०१ ऑगस्ट पासुन तालुक्यात रोजगार मेळाव्यासाठी प्रत्येक गावात किमान २० दिवस सर्व्हे करणार असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजक मनोज पवार यांनी दि.३१ जुलै रोजी पत्रकार परिषदेत केले

तालुक्यातील युवकांच्या हाताला काम मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न आपल्या तालुक्याला भेडसावत आहे,दिवसागणिक कन्नड तालुका हा



मागासलेला होत चालला युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने दि.०१ ऑगस्ट पासून कन्नड तालुक्यातील सर्कलनिहाय सर्व्हक्षण करण्यात येत आहे,शिक्षण तशी नोकरी या उपक्रमा अंतर्गत तालुक्यातील युवकांच्या हाताला काम मिळेल अशी ग्वाही त्यांनी दिली, कन्नड तालुक्यात एकूण चाळीस कंपन्यांचे प्रतिनिधी येणार असून जागेवरच निवड प्रक्रिया करण्यात येणार आहे, त्याआधी मुलाखत कशी द्यावी,बायोडाटा कसा बनवावा अशा अनेक विषयांवर कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे उद्योजक समाजसेवक मनोज पवार यांनी सांगितले. यावेळी उपस्थित नितीन शेलार, कृष्णा मोहिते, महेश सोनवणे, मनोज देशमुख, रुपेश भारुका, संजय मनगटे,संगेश भारुका, पवन ठाकूर,योगेश त्रिभुवन,शंकर राऊत,आदित्य गायकवाड, बंटी जाधव, सह उद्योजक मनोज पवार मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## एमजीएम विद्यापीठास प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती

### वर्ष २०२४ -२५ साठी बहुसंख्य अभ्यासक्रमांचे प्रवेश पूर्ण

छत्रपती संभाजीनगर, दि. २ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षाकरिता प्रवेशासाठी विद्यार्थी प्राधान्य देत असून विद्यापीठातील बहुसंख्य विद्याशाखांचे प्रवेश पूर्ण झाले आहेत. यावर्षी विद्यार्थ्यांचा कल हा अभियांत्रिकी शाखेकडे आहे. त्याचप्रमाणे कंप्यूटर सायन्स इंजिनियरिंग, एआयएमएल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन, फॉरेन्सिक, बायोलोजिकल सायन्सेस, फार्मसी, लॉ, सोशल वर्क, सायकॉलॉजी, डिझाईन, मॅनेजमेंट अशा विद्याशाखांची विद्यार्थ्यांनी निवड केलेली आहे.

एमजीएम विद्यापीठात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, मूलभूत आणि उपयोजित विज्ञान, व्यवस्थापन आणि वाणिज्य , सामाजिक विज्ञान आणि मानव्यविद्या, प्रयोगकला विद्याशाखा, आंतरविद्याशाखीय शिक्षण, फॅकल्टी ऑफ डिझाईन या विद्याशाखांतर्गत अभियांत्रिकी, व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, संगणकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन, फाईन आर्ट्स, नृत्य, कला, पत्रकारिता, फिल्म, फोटोग्राफी, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, समाजकार्य, ग्रंथालय व माहितीशास्त्र, भारतीय आणि परकीय भाषा, फायर इंजिनिअरिंग, शारीरिक शिक्षण, विधी, फॉरेन्सिक सायन्स, फार्मसी आणि योग इत्यादी पदवी, पदव्यूत्तर पदवी, पदविका व प्रमाणपत्र तसेच पीएच.डी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

## एमजीएममध्ये डॉ. विद्युत भागवत व डॉ. शर्मिला रेगे यांना अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि.२: एमजीएम विद्यापीठातील स्त्री व लिंगभाव अभ्यास विभागाच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत व स्त्रीवादी कार्यकर्त्या डॉ.विद्युत भागवत व डॉ.शर्मिला रेगे या दोन स्त्रीवादी लेखिका यांच्या स्मृतीनिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती.



यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालिका डॉ. निर्मला जाधव यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी या दोन स्त्रीवादी अभ्यासकांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा देत त्यांचे स्त्रीवादी चर्चाविश्व, स्त्री चळवळीसोबत असलेली वैचारिक बांधीलकी याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. विदेशी व भारतीय भाषा अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. के. पी.सिंग हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. भागवत वाघ यांनी मनोगत व्यक्त केले. या अभिवादन सभेचे प्रास्ताविक स्त्री व लिंगभाव अभ्यास विषयाच्या प्रा.डॉ.मंजुश्री लांडगे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार शिक्षणशास्त्र विषयाच्या प्रा.अनिता फुलवाडे यांनी केले.

यावेळी डॉ.रसिका वडाळकर, प्रा.करुणा घोडकी, डॉ. वैशाली हजारे, डॉ. रिहाना सय्यद, डॉ. झरिना देशमुख, डॉ. अस्वद गोहर, डॉ. प्रज्ञा कोनार्डे, डॉ. इम्रान पठाण, डॉ.साजिद, डॉ. रामेश्वर कणसे, प्रा.आशुतोष पाटील, डॉ. राजू सोनवणे, डॉ. राम गायकवाड, डॉ.मारोती गायकवाड, प्रा. राहुल खरे, निलेश बेडके, अरुणा पेंटेवार यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशाल अहिरे व सौ.अनिता यांनी परिश्रम घेतले.

## सार्वजनिक बांधकाम विभागचे कर्मचारी सेवानिवृत्त

फर्दापूर दि २ फर्दापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे ज्येष्ठ कर्मचारी सुभाष त्रंबक बलांडे हे २८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि.३१ ऑगस्टला नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.सेवानिवृत्ती निम्मित शासकीय विश्रामगृह कार्यालयात विभागाच्या वतीने त्यांचा सहपत्नी सत्कार करण्यात आला.




यावेळी उपअभियंता अजय टाकसाळ, कनिष्ठ अभियंता एस.जे. सोनवणे,शाखा अभियंता डी.के. दराडे, एस.पी. वाघमारे,कनिष्ठ अभियंता एन.जी.राठोड,शब्बीर शेख आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जि. प. प्रशाला नाचनवेल शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुनील धुमाळ, उपाध्यक्षपदी कैलास धनगे



नाचनवेल: दि.२. ऑगस्ट- जि. प .प्रशाला नाचनवेल शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली. दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी जि.प. प्रशाला नाचनवेल येथे शाळा व्यवस्थापन समिती गठीत करणेसाठी पालकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये आरक्षण सोडती प्रमाणे वर्गनिहाय सदस्य उपस्थितांतून निवड करून त्यानुसार नवनिर्वाचित शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील धुमाळ तर उपाध्यक्ष कैलास धनगे यांची एकमताने निवड करण्यात आली. याप्रसंगी नवनिर्वाचित सदस्य छाया सोळुंके,रुखय्या शहा, मनीषा निकम,वर्षा राजपूत,नजीर शेख, गणेश थोरात शिक्षण प्रेमी), ताराबाई सुरडकर अंगणवाडी प्रतिनिधी, पवन कारमेंगे (शिक्षक प्रतिनिधी), सुनिता वडगावकर मु.अ.(सचिव) आदींची सदर आयोजक बैठकीमध्ये निवड करण्यात आली .मुख्याध्यापक वडगावकर व सर्व शिक्षक वृंद व माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजय राजपूत व उपाध्यक्ष विश्वनाथ थोरात यांचे तर्फे तसेच प्रशालेच्या वतीने नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नेहमी शाळेसाठी सहकार्य करावे अशी विनंती करण्यात आली.

## बिडकीन येथे लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



बिडकिन दि २ ऑगस्ट.पैठण तालुक्यातील बिडकीन येथील निलजगाव फाटा परिसरात गुरुवार रोजी सकाळी १० वाजता लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करत अभिवादन करण्यात आले.यावेळी पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील,बिडकीन ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे, ग्रामपंचायत सदस्य रमेश शिंदे, अंकुश धर्मे,,मधुकर सोकटकर,मोहन हिवाळे, , प्रविण चव्हाण,किरण गुजर ,सागर फरताळे, राहुल ठाणगे, आदींसह भरत मोघे, रविंद्र गायकवाड,विठ्ठल आहेर, लहु मोघे,शिवा घोरपडे,राम साळवे, संतोष ताकवाले, प्रविण गायकवाड आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.यावेळी बिडकीन पोलीस ठाण्याचे कर्मचारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.
किरकोळ दिवाणी अर्ज क. ९२/२०२४

अर्जदार : १. रविब खान मजिद खान, वय ५४ वर्षे, धंदा गती, ग. मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक २. हबीब खान मजिद खान, वय ५० वर्षे, धंदा गती, ग. वरीलप्रमाण ३. नसिमबी आशकअली सैयद, वय ४९ वर्षे, चंदा गरकाम, रा. घाटणेंद्रा, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर ४. रहिमा बानो शेख रफिक, वय ४५ वर्षे, भंदा घरकाम, रा. मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक, ५. सुफियाबी युसुफ पठाण, वय ४९ वर्षे, बंदा गती, रा. तिडका, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ६. तौसिफ खान युसुफ खान, वय ३२ वर्षे, धंदा, रा. आमठाणा, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर ७. सिमाबी इब्राहिम शेख, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. वाडी बनोटी, ता. सोयगांव, जि छ. संभाजीनगर ८. राजु युसुफ पठाण, वय २९ वर्षे, बंदा गती, रा. आमठाणा, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर. ९. सोहेब युसुफ पठाण, वय २६ वर्षे, बंदा शेती, रा. वरीलप्रमाणे

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारान वाग्ग प्रमाणपत्र मिळणंसाठी ॲड. एस. एस. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरगाचाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत रेहमतबी मजित खान ह्या दि. ०५/०१/२०२४ रोजी मालेगांव, ता. मालेगांव, जि.नाशिक येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत रेहमतबी मजित खान यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वाग्ग प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप अरोल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात यांग्य न्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र
देण्यात येईल. पुढील तारीख २३/०९/२०२४.
आज दि. ०१/०८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुनु

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांच्या न्यायालयात**

सिव्हील एम.ए.क्र. ३११ /२०२४ — पु.ता.१२/०९/२०२४

अर्जदार : १) माधव पि. सुदाम देवरे वय : ४७वर्ष, धंदाः खाजगी नौकरी रा. गजल हॉटेलच्या मागे रामकृष्ण नगर ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर २) प्रमोद पि. सुदाम देवरे वयः४६वर्ष, रा. रावंदे ता. कोपरगाव जि. अहमदनगर., ३) प्रशांत पि. सुदाम देवरे वयः ३४वर्ष, धंदाः खाजगी नौकरी रा. गजल हॉटेलच्या मागे रामकृष्ण नगर ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरक

विषय : लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत..

ज्याआर्थी वरील अर्जदारानी मा. न्यायालयात ॲड. राहुल आर. वायसळ, औरंगाबाद यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई नामे सुमनबाई सुदाम देवरे हया दिनांक २४/०३/२०२० रोजी मौजे श्रीरामपुर येथे मयत झाले असुन मयताच्या नावे प्लॉट नं. १५ अंतापुर / हर्सल ता. गंगापुर, जि. औरंगाबाद हि मिळकत असुन असुन मयताच्या पश्चात अर्जदार क्र. १ते ३ हेच कायदेशीर वारस असुन यांच्या शिवाय इतर कोणीही वारस नाही अर्जदार क्र. ३ यांच्या नावे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत अर्जदार क्र. १ ते २ यांची संमती असुन या बाबत कोणास उजर, आक्षेप असेल त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्दीपासून ३० (तीस) दिवसात मा. न्यायालयात नोंदवावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदार क्र. ३ यांच्या नावे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता आज दि.०२/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — न्यायालय अधिक्षक
दिवाणी न्यायालयात क. स्तर गंगापुर औरंगाबाद.

# तरुण भारतच्या वृत्ताने जिल्ह्यातील निष्ठावंतांचे समाधान? झाले तर चाटुगिरी करणाऱ्यांचा जळफळाट!


**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

काल दि.२ ऑगस्ट रोजीच्या दै.तरूण भारत च्या वृत्तपत्रातील जालना पानावर गुत्तेदार दानवे यांच्या नियोजनामुळे जालना भाजपाच्या २५ वर्षाच्या सत्तेला सुरूंग लागला अश्या आशयाचे वृत्त प्रकाशित झाले होते. या वृत्तामध्ये भाजपाचा लोकसभेमध्ये पराभव कोणत्या आणि कश्यामुळे झाले याबद्दल थोडक्यात विश्लेषण करण्यात आले होते, हीच गोष्ट निष्ठावंत कार्यकर्त्यांना योग्य वाटली मात्र काही लाळचाटे कार्यकर्त्यांच्या मात्र चांगलीच जिव्हारी लागली आहे. त्यामुळे अशीच बोलण्याची वेळी आली आहे. निष्ठावंत भाजपा कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले तर नेत्यांची चाटुगिरी व पुढे-पुढे करणाऱ्या कार्यकर्त्यांचा मात्र चांगल्या प्रमाणात जळफळाट झाला आहे.

राज्यात येणाऱ्या २-३ महिन्यात विधानसभेचा


गुत्तेदार भास्कर दानवेंच्या नियोजनामुळेच भाजपाच्या जालना जिल्ह्यातील २५ वर्षाच्या सत्तेला लागला सुरुंग!

निवडणुका लागण्याची दाट शक्यता आहे. याच पार्श्वभुमीवर जिल्ह्यात सर्वच पक्ष आपआपल्या परीने आपला गड राखण्यासाठी लोकहिताच्या कामांचा देखावा करून नागरीकांना आकर्षीत करतांना दिसत आहे. भाजपा मात्र कुठेही प्रचारसाठी आग्रही अथवा कोणतेही जनहिताची कामे करण्यात कुठेही दिसत नाही, कार्यकर्त्यांमध्ये आलेली उतरती कळा याकडे पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी लक्ष द्यावे जेणेकरून लोकसभेला जी पक्षाची अवस्था झाली तिच अवस्था विधानसभेला होऊ नये. दै.तरूण भारतने जालना जिल्ह्यात झालेली भाजपाची सत्य परिस्थिती आपल्या लेखणीद्वारे मांडल्यामुळे अनेक भाजपा निष्ठावंत कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले तर चाटुगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा मात्र जळफळाट झाला.



**भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील भाजपाची झालेली अवस्था लेखणीद्वारे मांडल्याबद्दल नाव न छापण्याच्या अटीवर आभार मानले.**

### धमकी देण्याचा प्रयत्न!

जिल्ह्यातील नेत्यांची चाटुगिरी व पुढे-पुढे करणाऱ्या एका कार्यकर्त्याने प्रतिनिधीशी मो.नं. ७०३८२७५१२२ या क्रमांकाच्या फोनद्वारे धमकी देण्याचा प्रयत्न केला मात्र त्या धमकीला दै.तरूण भारतने कुठलिही भिक घातली नाही.

# मानसिक आरोग्यासाठी शाळेत समुपदेशक असणे काळाची गरज -डॉ.नोपानी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले रहावे, यासाठी शाळेत समुपदेशक असणे अत्यंत गरजेचे आहे. ही जबाबदारी एखाद्या शिक्षकाने पार पाडावी. ज्या समस्या विद्यार्थी आपल्या घरच्यांना सांगू शकत नाहीत, त्या समुपदेशकाकडे मोकळेपणाने मांडतील आणि त्यामुळे विद्यार्थी तणावमुक्त राहतील म्हणजेच शाळांमध्ये समुपदेशन ही मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी महत्वाची पाऊलवाट ठरेल, असा विश्वास मानसोपचार तज्ञ डॉ. मानसी नोपाणी - मोरे यांनी येथे बोलताना व्यक्त केला. मानसिक आरोग्य, त्याचे परिणाम आणि त्यातून बाहेर कसे पडायचे, या विषयावर इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे शुक्रवार दि. २ ऑगस्ट रोजी सेंटमेरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमात डॉ. मानसी नोपानी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी स्कूलचे प्रिन्सिपल रेव्ह. फादर पत्रास, क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत, सचिव ड. पिंकी लड्डा आदींची उपस्थिती होती. डॉ. नोपानी पुढे म्हणाल्या की, मानसिक आरोग्य म्हणजे आपल्या मनाची, भावनांची आणि वर्तनाची स्थिती असते. यामध्ये आपला ताण-तणाव व्यवस्थापन, जीवनातील आव्हानांशी जुळवून घेणे आणि निरोगी नातेसंबंध निर्माण करण्याची क्षमता समाविष्ट असून, मानसिक आरोग्य चांगले असणे म्हणजे जीवनाचा पूर्ण आनंद घेणे होय. लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

आपली कार्यक्षमता वाढवणे, ताण, चिंता आणि नैराश्य यांसारख्या समस्यांचा परिणाम आपल्या मानसिक आरोग्यावर होऊ शकतो, त्यामुळे योग्य वेळेत उपचार आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असे त्या म्हणाल्या. मानसिक आरोग्य, त्यामुळे होणारे परिणाम व त्यातून वाचण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपायांबद्दल त्याचबरोबर सायबर गुन्हे, या प्रकारांना कसा आळा बसेल, याबाबतच्या उपाययोजना सांगून मोबाईल पाहण्याचा वेळ कसा ठरवावा, ताण-तनाव व्यवस्थापना वेगवेगळ्या ब्रीदिंग टेक्निक्स त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवल्या. याप्रसंगी ड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, सामाजिक कार्य म्हणजे फार काही मोठे करावे, असे नव्हे. छोट्या छोट्या गोष्टीतूनही आपण सामाजिक कार्यात योगदान देऊ शकतो. दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविणे, आपल्या मित्रांना आणि आजूबाजूच्या जनतेला मदत करणे म्हणजेदेखील सामाजिक कार्य होय. त्यातून चांगले मानसिक आरोग्य लाभते. अशा प्रकारच्या सामाजिक मदतीतून मिळणारा आनंद सर्वोपरी असतो, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाला क्लबच्या सदस्य पुनम खंडेलवाल, पायल अग्रवाल, स्कूलच्या शिक्षिका संगीता इलाईस, प्राजक्ता चव्हाण यांच्यासह विद्यार्थी आणि शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी अर्णव कुलकर्णी आणि अनया निहाल यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सोनाली वाघ हिने मानले.

## संक्षिप्त

### आ.बच्चु कडू यांच्या उपस्थित दिव्यांग आक्रोश मोर्चाचे आयोजन -तनपुरे

**तभा वृत्तसेवा**
**वाटुर/प्रतिनिधी**




प्रहार संघटनेचे संस्थापक व दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष मुंबई तथा मा. मंत्री आ. बच्चू भाऊ कडू यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त कार्यालयावर दिव्यांग आक्रोश मोर्चाचे आयोजन दिनांक ९ / ८ /२०२४ दिव्यांगाच्या विविध मागण्यासाठी केले दिव्यांगाच्या मागण्या खालील प्रमाणे १ दिव्यांगांना प्रति महिना सहा हजार रुपये पेन्शन लागू करावी २ बेघर दिव्यांगांना एक गुंठा जागा देण्यात यावी ३ ग्रामपंचायत नगरपरिषद महानगरपालिका यामध्ये राजकीय आरक्षण देण्यात यावे ४ सार्वजनिक ठिकाणी व सरकारी कार्यालय अडथळा विरहित करा ५ दिव्यांगांना पात्रतेनुसार सरकारी नोकरी द्या ६ दिव्यांगांना व्यवसाय करण्यासाठी २०० स्क्वेअर फुट जागा उपलब्ध करून देण्यात यावी ७ दिव्यांगांना विन-ाआट घरकुल देण्यात यावे ८ बोगस दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी ९ दिव्यांगासाठी दहा लाखाची आरोग्य विमा पॉलिसी सरकारने काढावी अशा दिव्यांगाच्या अनेक प्रश्नांवर मोर्चाचे आयोजन केलेले आहे तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांग बंधू-भगिनींनी दिव्यांग आक्रोश मोर्चामध्ये सहभागी होऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अभी नही तो कभी नही असे अशोक तनपुरे जिल्हा निरीक्षक प्रहार संघटना जालना यांनी पत्रकामध्ये अशी माहिती दिली आहे

### परतूर येथे लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी मा.नगरसेवक बाबुराव हिवाळे यांच्या प्रमूख मार्गदर्शन लाभले परतूर येथील प्रमूख पाहुणे आणि मान्यवर यांनी जयंती मध्ये उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची सोभा वाढवली सर्व मान्यवर यांनी डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून जयंती चा आस्वाद घेतला,जयंती मधील मिरवणूक कार्यक्रम शांततेत पार पाडण्यासाठी नगरसेवक बाबुरावजी हिवाळे यांचे प्रमुख मार्ग दर्शन लाभले. सकाळी.१० वाजता साठे नगर सभागृह येथील ध्वजारोहण संपन्न झाले असून लोकशाहीर डॉ,आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर व्याख्यानाचा कार्यक्रम चालू करण्यात आला त्या प्रसंगी कार्यक्रम च्या अध्यक्ष स्थान प्रा.नंदाताई लोखंडे यांनी स्वीकारले तर प्रमुख मान्यवर प्रवीण भैया जेथलिया, बाबुरावजी हिवाळे ( नगर सेवक) राजेशजी खांडेलवाल(नगर सेवक), नाना राखे,(नगर सेवक) प्रकाश चव्हाण ,(नगर सेवक) डॉ,नवल सर, दीपक कदम महेश भैया नळगे, बळीराम हिवाळे ,कृष्णा कारके, प्रधान अशोक पूरुळे, संजय खणपटे, राजु गायकवाड,अजय कांबळे ,गोविंद हिवाळे जयंती समिती पुढीलप्रमाणे कार्यरत होती अध्यक्ष गणेश लालझरे, उपाध्यक्ष अनिल पांजगे, सचिव, सतीश कारके, कोषाध्यक्ष, संतोष पूरुळे सदस्य, आकाश घोडे,नामदेव राक्षे, सुमित हिवाळे, बरून हिवाळे, विशाल नाटकर, अशोक पाटोळे ,अरुण हिवाळे,रोहित हिवाळे, नितीन कांतीराम हिवाळे, अमोल पिंपळे,राहुल साठे,अशोक घोडे,राहुल गवारे ,यांची उपस्थिती होती.



**तभा वृत्तसेवा**

जालना : डॉ .बाबासाहेब आंबेडकर सर्वपक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या वतीने साहित्यरत्न, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले .यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन कांबळे, पँथर कपिल खरात, सागर पाटील, अजय दळे , गणेश वाढेकर , शरद भुम्बर ,शिवाजी राऊत, दीपक कायंदे , सुनील पाटोळे, ईश्वर जाधव, प्रवीण रत्नपारखे ,सागर ससाने ,प्रशांत भांगरे ,सुरज बोर्डे, प्रकाश कसबे ,ऋषिकेश हिवाळे, आशिष पाटील, प्रतीक केवडकर आदींची उपस्थिती होती.


# देवमूर्ती येथील कॉँग्रेससह अनेक मुस्लीम बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

## कोणावर अन्याय होणार नाही -अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

तालुक्यातील देवमूर्ती येथील अनेक मुस्लीम बांधवांनी तसेच कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेत प्रवेश केला. दरम्यान, या सर्वांचा श्री. खोतकर यांनी सत्कार केला. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, शिवसेनेत कसल्याही प्रकारचा भेदभाव केल्या जात नाही. आज एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रवेश पार पडत असले तरी कोणावरही अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, अशी ग्वाहीही श्री. खोतकर यांनी दिली.पक्षाचे काम पाहूनच अनेक जण शिवसेनेत प्रवेश घेण्याच्या मन:स्थितीत असल्याचेही श्री. खोतकर म्हणाले.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख पंडीतराव भुतेकर, युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, ॲड. अशपाक पठाण, शिवाजी शेळके, सुनिल रत्नपारखे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी ग्रामपंचायत पॅनल प्रमुख ज्ञानेश्वर माऊली जाधव सय्यद कयूम भाई हाजी साहेब उपसरपंच,सय्यद हारुणभाई (हाजी साहब, महेमूदभाई, शेख हसमुद्दीन , संभाजी जाधव (माजी सरपंच), ग्रामपंचायत सदस्य कृष्णा जाधव, रामचंद्र फुलझाडे(माजी जि. प. सदस्य), माझी पंचायत समिती सदस्य श्रीमंतराव जाधव,



ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल चव्हाण, जगन्नाथ फुलझाडे , अमोल जाधव, अंकुश चव्हाण, कैलास जाधव, ज्ञानेश्वर फुलझाडे, शामराव फुलझाडे, प्रकदीम म्हस्के, साहेबराव फुलझाडे, कृष्णा कदम, बळीराम चव्हाण, रमेश कदम, सय्यद कलीमभाई, सय्यद सलीमभाई, अन्वरभाई, सय्यद पैलवान,बाबुभाई सय्यद, अफसरभाई, सय्यद , सय्यद रहिमभाई, सय्यद रफीकभाई, सय्यद अहेमदभाई, सय्यद सिद्दीक पहेलवान, सय्यद मोईन पहेलवान, सय्यद नुरखान, पठाण शब्बीरभाई, शेख नुरोद्दीन, सय्यद अल्ताफ, सय्यद अशपाक, सय्यद जंगू, सय्यद खालील , शेखअमीन, सय्यद अलीमभाई, सय्यद सलीमभाई, साहेबराव फुलझाडे, बळीराम चव्हाण, जावेद पठाण, अकील पठाण, अशफाक शहा, कडु शहा, महेबुब शहा, मसुर शहा, सय्यद एजाज, ईस्माईल सय्यद, समद शहा, रजादेक शहा, सौफियान पठाण, शौकत शहा, राजुभाई पठाण, शेख अमिर, शेख अमर, शेख अब्बु, शेख कलीम, शेख तालीब, पठाण आरुण, शेख मोसीन, शेख अमीन, शेख शरीफ, सय्यद आतिकभाई, सय्यद कैसर, सय्यद अक्रम, फैजल पठाण, शेख रहेमान, शेख इम्रान, शेख मुज्जमील, शेख सोएल, शेख अशफाक, सय्यद खलील, आदींनी यावेळी श्री. खोतकर यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश घेतला. यावेळी गावकरी तसेच शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# परतुर- मंठा विधानसभा मतदार संघासाठी नाना पटोले यांचा अविनाश चव्हाण यांना दूजोरा

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

परतुर मंठा मतदार संघातुन बंजारा समाजाचे सामाजिक कार्यकर्ते अविनाश चव्हाण हे कॉंग्रेस पक्षाकडुन निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याने ते आज दि.२ ऑग्स्ट रोजी मुंबईत जाऊन राष्ट्रीय कॉंग्रेस चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेतली.यावेळी त्यांच्या सोबत गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.संदेश चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते ऊद्धवराव पवार,राजु राठोड यांची उपस्थिती होती.

या बैठकीत अविनाश चव्हाण यांनी सांगीतले की,मंठा परतुर हा मतदारसंघ बंजारा बहुल असुन बंजारा समाजाची साठ ते पास्सष्ठ हजार लोकसंख्या आहे.यापुर्वी



तयारी नसतांना मी अचानक अपक्ष निवडणुक रींगणात उतरलो होतो त्यावेळी मला सत्ताविस हजार ईतके मताधिक्य मिळाले होते. यावेळी सर्वच समाज माझ्या पाठीशी असल्यामुळे मला जर कॉंग्रेस पक्षाकडून परतुर -मंठा मतदार संघातुन निवडणूक लढविण्याची संधी मिळाली तर आपलाच विजय निश्चित असल्याचे मत त्यांनी मांडले.

यावेळी सर्व बाबी ऐकुन घेत अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले की कामाला लागा पक्षाचे काम वाढवून संपुर्ण जनतेत कॉंग्रेस पक्षाचे विचार मांडा आम्ही तुमचा जरूर विचार करू असा शब्द देऊन अविनाश चव्हाण यांना उमेदवारी देण्याचा सकारात्मक दुजोरा दिला असल्याची माहिती उध्दव पवार यांनी दिली.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी किसनराव मोरे यांचे तहसीलदारांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी व चोवीस तास वीजपुरवठा मोफत द्यावा या व इतर मागण्यांसाठी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे यांनी तहसीलदारांना निवेदन दिले. या संदर्भात तहसीलदार सोनाली जोंधळे यांना शुक्रवार ता.२ रोजी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर निवेदन देऊन चर्चा केली. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, चोवीस तास वीज पुरवठा व मोफत द्यावा, सततच्या रिमझिम पावसामुळे पिवळे पडलेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, सन २३-२४ मधील हरभरा पिकांच्या पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ द्यावी, शेतकऱ्यांच्या शेतीमालास हमीभाव देण्यात यावा, सन २०२३ - २४ चे दुष्काळी अनुदान वाटप करावे आदी मागणी निवेदनात करण्यात आले आहेत. सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांच्या मागण्या तात्काळ मान्य न केल्यास कॉंग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष किसनराव मोरे, शिवप्रसाद मोरे, अर्चना राऊत, मुन्ना ढवळे, विष्णुपंत बोराडे, भगवान बोराडे, जगन दवणे, पंकज दवणे, राजू दवणे, संतोष ढवळे, पांडुरंग काळे, कैलास दवणे, राजेभाऊ खवणे, संदीप वैद्य, प्रभाकर वैद्य, पुरुषोत्तम वैद्य यांच्या सह्या आहेत.


## जाहिर निवेदन

ग्रामपंचायत कार्यालय, तळणी
ता.मंठा जि.जालना
दि.३१/०७/२०२४

**विषय : मौजे तळणी येथील तलाव कापकऱ्यातील (देवीच्या) मंदिरा-जवळील तलाव मच्छीपालनासाठी हाराशी करणे बाबत.**

दिनांक : ०६/०८/२०२४ ते ३०/३०/०७/२०२५ पर्यंत (देवीच्या) मंदिराजवळलील तलाव मच्छीपालनासाठी हाराशी करणे बाबत.

महोदय,

वरील विषयी सर्व गावकऱ्यांना सूचित करण्यात येते की, मौजे तळणी येथील तलाव कापकऱ्यातील मच्छीपालनासाठी हाराशी दिनांक ०६/०८/२०२४ रोजी सकाळी ठिक १०.३० मी. ग्रामसचिवालय तळणी येथे लिलाव आयोजीत केला आहे. तरी ज्यांना मच्छीपालनासाठी तलाव हाराशी घेण्याची इच्छा असेल त्यांनी ग्रामसचिवालय तळणी येथे ०६/०८/२०२४ रोजी मंगळवार सकाळी ठीक १०.३० वा.हजर रहावे. तरी लिलावाबाबत हाराशी बाबत अटी खालील प्रमाणे असेल.

१) बोली बोलणारास अनामत रक्कम रोख १०००० (दहा हजार) भरावे लागेल.
२) बोली बोलणाराचे नावे हाराशी सुटल्यास पैशाचा भरणा त्याच दिवशी ५ वा.पर्यंत करावा लागेल, पैशाचा भरणा त्याच दिवशी न केल्यास अनामत रक्कम परत मिळणार नाही व हाराशी बोली नं.२ च्या व्यक्तीस देण्यात येतील.
३) लिलावा बाबत सर्व अधिकारी ग्रा.पं.स्वत:कडे राखुन ठेवलेले आहेत.
४) हाराशीचे तारखेपासुन लिलाव दिनांक ०६/०८/२०२४ ते ३०/०७/२०२५ पर्यंत हारशी घेणाऱ्याच्या ताबब्यात असेल.
५) थकबाकी दारास बोली बोलण्याचा अधिकार राहणार नाही.

**स्वाक्षरीत**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय तळणी**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय तळणी**
**लिपीक**
**ग्रामपंचायत कार्यालय तळणी**


# पर्यावरणाचा समतोल व्यवस्थित राखण्यासाठी राज्यातील प्रत्येक नागरिकांनी वृक्ष लागवड केली पाहिजे -आ.लोणीकर

## पाऊस पडणारे ऑक्सिजन देणाऱ्या ५१ देशी वृक्षांची वृक्षारोपण करण्याचे आ.बबनराव लोणीकरांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल व्यवस्थित राखण्यासाठी वृक्षांची संख्या कमी होऊन चालणार नाही. वृक्ष हे पर्यावरणातील खूप महत्वाचा भाग आहेत. आपल्या भोवताली असलेली झाडे आपल्याला फक्त सावली देत नाहीत तर वृक्षांपासून आपल्याला अनेक फायदे आहेत. वृक्ष वातावरणातील कार्बन डायऑक्साइड स्वतःकडे घेतात आणि जीवनावश्यक असा अक्सिजन आपल्याला देतात. पर्यावरणाचा समतोल व्यवस्थित राखण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने प्रत्येकी दोन वृक्षाची लागवड केल्यास देशभरात हरित क्रांती होईल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. सुरूमगाव तालुका परतूर जिल्हा जालना येथे ग्रामसेवक संघटना तालुका परतुर व



पंचायत समिती परतुर कर्मचारी यांच्यावतीने आयोजित वीस हजार घनदाट वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या शुभारंभ सोहळ्या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या प्रसंगी व्यास पिठावर भाजपा चे परतूर तालुका अध्यक्ष शत्रगुण पाटील कणसे भाजपा जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर विनायक लहाने आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रवी सोळंके, संभाजी वारे, बाबाराव थोरात, तुकाराम सोळंके, मधुकर मोरे, सखाराम लहाने, सुभाष कोल्हे जालना जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण, तहसीलदार प्रतिभा गोरे, परतूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तांगडे, परतुर तालुका ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष डीबी काळे, बाबाजी चव्हाण यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री सुधीर भाऊ मनगुंटीवार यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यातील गावागावात वृक्ष लागवडीचे झालेले कार्य अभिनंदनीय असून वृक्ष लागवडीची व्यापक चळवळ राज्यभरात अधिक गतीने निर्माण व्हावी याकरिता राज्यातील सर्वसामान्य नागरिकांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण केलं पाहिजे. बांधावर आणि शेतीत वृक्ष लागवड करण्याकरिता केंद्र आणि राज्य सरकार विविध योजना राबवत असून परतुर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त फळबागा आणि वृक्ष लागवड आणि बांधावरची वृक्ष लागवड केली पाहिजे. याकरिता आवश्यक निधी विविध योजनेला उपलब्ध करून देण्याकरिता आपण सर्वतोपरी प्रयत्न करू असं आश्वासन देखील आमदार लोणीकरांनी उपस्थितांना दिल. वृक्ष लागवडीचे महत्त्व उपस्थित त्यांना सांगताना आमदार लोणीकर म्हणाले की महाराष्ट्रात सततच्या दुष्काळामुळे शेतकरी बांधवांच्या आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या कायमच्या थांबवायचे असतील महाराष्ट्राला दुष्काळ मुक्त करायच असेल तर प्रत्येकाने वृक्ष लागवड करावी.

## अग्रलेख...

# आवाज आणि आयुधे!

लोकशाही देशाचा सर्वोच्च कायदा म्हणून ज्याचे वर्णन केले ते संविधान, म्हणजेच देशाची राज्यघटना गेल्या काही महिन्यांपासून राजकारणाच्या केंद्रस्थानी येऊन आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळामुळे चर्चेचा विषय बनली आहे. या संविधानाच्या आधारावरच लोकशाही व्यवस्था उभी राहिली आहे. संविधानाने घालून दिलेल्या नियमांच्या चौकटीतच संसदेचे कामकाज चालले पाहिजे, असे संकेत आहेत. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष ही संसदीय लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत, असे म्हटले जाते. म्हणजे लोकशाहीची ही सर्वोच्च व्यवस्था संसदीय संकेतांचे संपूर्ण पालन करून चालविली गेली पाहिजे याकरिता सत्ताधाऱ्यांप्रमाणेच विरोधकांनीही जबाबदार भूमिका पार पाडावी, अशी अपेक्षा असते. देशाच्या १८ व्या लोकसभेत विरोधकांचे संख्याबळ लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे ही जबाबदारी वाढली आहे. १७ व्या लोकसभेच्या कार्यकाळातील विरोधकांचा आवाज कमी संख्याबळामुळे क्षीण होता आणि सत्ताधारी भाजपाकडे प्रचंड बहुमत होते. त्यामुळे विरोधकांच्या बाकावरील नेत्यांचा प्रभाव लक्षणीय नव्हता, हे वास्तव नाकारता येत नाही. १८ व्या लोकसभेत इंडिया आघाडी नावाच्या संघटित शक्तीची साथ घेऊन काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधकांची एक भक्कम फळी उभी राहिल्याने साहजिकच देशाचे लक्ष आता सत्ताधाऱ्यांप्रमाणेच विरोधकांच्या भूमिकेकडे आणि त्यांच्या कार्यक्षमतेकडे केंद्रित झाले आहे. विरोधी पक्षांचा आवाज म्हणून लोकसभेत राहुल गांधी यांना जबाबदार भूमिका पार पाडावी लागेल, ही देशाच्या जनतेची भावना आहे. त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून संसदेतील त्यांच्या प्रत्येक वक्तव्याकडे, कृतीकडे आणि कार्यशैलीकडे देशाचे लक्ष लागले आहे. संसदीय कार्यप्रणालीची प्रतिष्ठा जपण्याकरिता संसदेच्या कामकाजाचे जे काही संकेत आहेत, नियम आहेत आणि लोकप्रतिनिधी किंवा विरोधी पक्षनेता म्हणून ज्या काही जबाबदाऱ्या आहेत, त्या सर्वांचे प्रामाणिक पालन करणे, ही राहुल गांधींची कसोटी ठरणार आहे. संख्याबळ वाढल्यामुळे लोकसभेतील विरोधी बाजूच्या आवाजाला धार चढली आहे. संसदीय कार्यप्रणालीचे पुरेपूर पालन करून सभागृहात देशासमोरील प्रश्न आणि जनतेच्या समस्यांवर आवाज उठविणे, ही विरोधी पक्षाची सर्वमान्य भूमिका असते. प्रसंगी आक्रमक होऊन विरोधी पक्षाचा आवाज धारदार व्हावा, यातही काहीच गैर नाही. पण केवळ संख्याबळाच्या जोरावर आवाजाची धार वाढविताना संसदीय आयुधांची धार बोथट होईल असे वर्तन, वक्तव्य किंवा कोणतीही कृती होऊ नये, अशीही देशाच्या जनतेची अपेक्षा आहे. १८ व्या लोकसभेच्या पहिल्या सत्रातील पहिल्या अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत विरोधी पक्षनेते पदावरून बोलताना राहुल गांधी यांनी जी काही शैली दाखविली, ती पाहता, संकेतांचे आणि विरोधी पक्षनेते पदाच्या जबाबदारीचे भान त्यांना देण्याकरिता विरोधकांतीलच कोणी बुजुर्गांनी पुढाकार घेण्याची गरज दिसू लागली आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यानच्या राहुल गांधींच्या भाषणाला विरोधकांच्या बाकावरून तडाखेबंद प्रतिसाद मिळाला; अनेकदा विरोधी बाजूंची बाके जोरदार बडविली गेली आणि त्यांच्या भाषणाची सर्वत्र चर्चा झाली. राहुल गांधींना भान राखावे लागेल, असा किंचित सूर त्यांच्या त्या भाषणानंतर देशात उमटू लागला होता; अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याचे भान राखले जाईल, अशीही अपेक्षा होती. दोन दिवसांपूर्वी अर्थसंकल्पावरील सभागृहातील चर्चेतील राहुल गांधी यांच्या भाषणातून या अपेक्षेचे प्रतिबिंब दिसते का, हे पाहणे आवश्यक झाले आहे. अर्थसंकल्पावरील भाषणातून त्यांनी संभ्रम माजविण्याचा प्रयत्न केला, असा आक्षेप सत्ताधाऱ्यांनी घेतला होता. पुढे चर्चेच्या उत्तरावरील अर्थमंत्र्यांच्या भाषणातून ते पुरेसे स्पष्ट झाले. सभागृहाबाहेरील मेळावे, सभांमध्ये बोलताना काही संदर्भांच्या सत्यतेचे भान राखणे सक्तीचे नसते. त्यामुळे अशा ठिकाणी केलेल्या वक्तव्यांची जबाबदारी त्या वक्त्यावर असते. प्रसंगी त्याचे खुलासे करावे लागतात, अनेकदा त्याबाबतच्या आक्षेपांकडे साफ दुर्लक्षही करता येते. काही वेळा न्यायालयापर्यंत जाऊन माफी-दिलगिरीदेखील व्यक्त करता येते, पण संसदेसारख्या प्रतिष्ठित आणि सर्वोच्च सदनात बोलताना संकेत, संदर्भ आणि सभ्यता या सर्वांचे जबाबदारीने पालन करणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य असल्याने राहुल गांधी यांचा कौटुंबिक राजकीय वारसा कितीही मोठा असला, तरी ते यास अपवाद ठरू शकत नाहीत.

गेल्या जून महिन्यात, १८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात काँग्रेसचे नेते आणि रायबरेली मतदारसंघाचे खासदार म्हणून लोकसभेत दाखल झालेले राहुल गांधी यांच्या विरोधी पक्षनेतेपदास अध्यक्षांनी मान्यता दिली आणि त्यांना सन्मानपूर्वक या आसनावर बसविण्यात आले. १ जुलै रोजी सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शक ठरावावरील चर्चेत विरोधी पक्षनेता या नात्याने पहिले भाषण करताना राहुल गांधींना वारंवार सभागृहाच्या कार्यसंकेताचे पालन करण्याच्या सूचना अध्यक्ष देत होते. सभागृहाच्या नियमानुसार कोणताही फलक, चित्र किंवा चिन्ह सभागृहात प्रदर्शित करता येत नाही, कोणाच्याही भावनांना धक्का लागणार नाही याची दक्षता घ्या, असे बजावत होते आणि 'मजा नही आ रहा है' म्हणत राहुल गांधी चित्र प्रदर्शित करण्याचा वारंवार प्रयत्न करत होते. राहुल गांधींच्या भाषणातील काही भाग कामकाजाच्या नोंदीतून वगळण्यात आला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाची प्रतिष्ठा जपली पाहिजे, हे लक्षात घेऊन अभिभाषणावरील चर्चेच्या मुद्यांशी सुसंगत बोला, असेही अध्यक्षांनी अनेकदा बजावले. हुतात्मा अग्निवीरांच्या कुटुंबीयांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक साहाय्याविषयी सभागृहात असत्य माहिती दिल्याचा आक्षेप संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी घेतला आणि सभागृह ही असत्य वक्तव्य करण्याची जागा नाही, असे ठणकावून बजावत राहुल गांधींच्या आरोपाची शहानिशा व्हायला हवी, अशी मागणी गृहमंत्री अमित शाह यांनी केली. मोदी हे सभागृहाचे नेते आहेत आणि वयाने ज्येष्ठ आहेत. वयाने ज्येष्ठ असलेल्या व्यक्तीचा सन्मान करावा, असे माझ्या संस्कृतीने मला शिकविले आहे, अशा सौम्य शब्दांत अध्यक्षांना राहुल गांधींच्या एका वक्तव्यावर संस्कृतीची जाणीवही करून द्यावी लागली. विरोधी पक्षनेता या नात्याने राहुल गांधी यांनी सभागृहात केलेल्या राजकीय भाषणातील तडाखेबंदपणातही, पदाच्या जबाबदारीचा संसदीय कार्यप्रणालीच्या प्रतिष्ठेच्या जाणिवांचा आणि गांभीर्याचा अभाव अधोरेखित झाला.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात २९ जुलै रोजी राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत विरोधी पक्षनेते पदावरून केलेल्या भाषणातही याच अभावाचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसते. जातिनिहाय जनगणना, कृषिमालाला किमान हमीभाव आदींबाबत त्यांनी केलेल्या वक्तव्यांवर सत्ताधाऱ्यांकडून घेतले गेलेले आक्षेप आणि संसदीय कार्यप्रणालीची प्रतिष्ठा जपण्याबाबत अध्यक्षांनी वारंवार राहुल गांधींना केलेले आवाहन पाहता, पुन्हा एकदा या पदाच्या आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न ऐरणीवर येणार असे दिसत आहे. सभागृहाच्या नियम आणि मर्यादांचे पालन करणे हे विरोधी पक्षनेत्याचे कर्तव्य आहे, याची वारंवार आठवण करून देतानाच, सभागृहाच्या मंचावरून असत्य कथन करणे योग्य नाही, याची जाणीवही राहुल गांधी यांना करून देण्याची वेळ अध्यक्षांवर आली. सभागृहाच्या व्यवस्थेवर शंका घेणे हे अप्रत्यक्षपणे अध्यक्षांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उमटविण्यासारखेच असते, हेदेखील अध्यक्षांना राहुल गांधी यांच्या निदर्शनास आणून द्यावे लागले. विरोधी पक्षनेता बोलत असताना विरोधकांच्या बाकांवरूनच त्यामध्ये अडथळे येत असल्याची बाब अध्यक्षांनीच अधोरेखित केली. सत्ताधारी सदस्य आणि विरोधी सदस्यांमध्ये नियमांच्या चौकटीत खडाजंगी होणे हे सभागृहात नवे नाही. अशा खडाजंगीतही सदनाच्या सभ्यतेचे, कार्यशैलीचे आणि प्रतिष्ठेचे पालन व्हावे, ही लोकशाहीची अपेक्षा असते. राहुल गांधी यांनी आपल्या पदाच्या कारकीर्दीचा प्रारंभ ज्या शैलीतून केला, ते पाहता या अपेक्षेचे काय होणार हा प्रश्न ठळक झाला आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

महाभारतात 'यक्षप्रश्न' आहेत. भारत देशातही गत १८०० वर्षांपासून एक यक्षप्रश्न आहे. तो आहे हिंदू-मुस्लिम या दोन जमातींच्या संबंधांचा! या प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडातील इतिहासाची पाने या यक्षप्रश्नाशी संबंधित असलेल्या घटनांनीच रक्ताळलेली आहेत. कोणत्याही संघर्षाचा इतिहास हा रक्तानेच लिहिला जात असतो. आजतागायत या प्रश्नाचे समाधान, उकल नीटपणे झालेली नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. आजच्या वर्तमान परिस्थितीत तर ती अधिक जटिल, गुंतागुंतीची, बहुआयामी, हिंदू समाजाच्या अस्तित्वालाच आव्हान करणारी आणि अधिकाधिक कडवी, जिहादी आणि आक्रमक होते आहे. त्याचे पडसाद, अनुभूती आणि व्हायरल होणाऱ्या विविध दृक्श्राव्य चित्रीकरणातून आपण घेतोच आहोत. भारताच्या सार्वभौमत्वाला ठोकरून आणि आव्हान देऊन संसदेत शपथ ग्रहण करताना 'जय फिलिस्तान'ची घोषणा करणाऱ्या, 'माझ्या मानेवर सुरी जरी ठेवली तरी मी 'भारत माता की जय' म्हणणार नाही' अशी उद्दाम व भारताविषयीचा जहरी फुत्कार करणाऱ्या ओवैसीपासून तर हिंदू समाजाच्या मातृशक्तीच्या, धर्मशक्तीच्या, चारित्र्याच्या श्रेष्ठ परंपरेला आव्हान देऊन त्याच्या छाताडावर बसून २१ युवतींचे सामूहिक धर्मांतरण घडविण्याचे मनसुबे रचणाऱ्या तारिक अन्वरपर्यंत सर्व बाजूंनी हिंदू समाजाची लांडगेतोड होताना आपण अनुभवत आहोत. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीतील मुस्लिमांच्या मतांच्या ध्रुवीकरणामुळे तर तुष्टीकरण हाच एकमेव राजकारणाचा आधार असलेल्या सर्व राजकीय पक्षांना 'हिरवी पालवी' फुटली आहे. विझत चाललेल्या महत्त्वाकांक्षांना नवीन धुमारे फुटताहेत. त्याने चेकाळून जाऊन हिंदूंवर वाटेल तसे आरोप-प्रत्यारोप करणारी बेताल बडबड संसदेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी करीत आहेत. त्यात त्यांचा काही दोष नाही. पूर्वजांचेच संस्कार कमी-अधिक प्रमाणात अभिसरित होत असतात. त्यांचे पणजोबा, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, ज्यांनी तीन वेळा हे सर्वोच्च पद भूषविले. त्यांच्या कारकीर्दीत भारताच्या विकासाची 'गती' आणि त्यांनी केलेल्या 'हिमालयीन ब्लंडर्स'मुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांमुळे भारताची भौगोलिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात झालेली 'अवनती' याचा विचारवंतांनी तुलनात्मक अभ्यास करून, त्याचे चिंतन करून त्यांचे मूल्यांकन करावे. त्यांची स्वत:विषयीची भूमिका त्यांनी लपविली नव्हती. ते स्पष्टपणे म्हणायचे, 'आय ॲम ॲक्सिडेंटली बॉर्न ॲज अ हिंदू-' त्यांच्या या मूलभूत प्रेरणेमुळे त्यांना कधीही मनापासून हिंदू संस्कृती, धर्म, परंपरा, समाज याविषयी प्रेम वाटत नसे. त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे या मूल्यांसाठी त्याग करणारे, जीवन अर्पण करणारे, अपार कष्ट करणारे, देशासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवणारे जे कोणी महापुरुष होते ते त्यांना 'वाट चुकलेले देशभक्त' वाटायचे. त्यांचा ते अधिक्षेप करायचे. मग त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांच्या पणतू असलेल्या राहुल गांधींनी जर हिंदू समाजाची हिंसाचारी, दहशतवादी म्हणून निर्भत्सना केली तर त्यांना कसा बरे दोष देता येईल; नाही का? कोणत्याही घराण्याचे संस्कार शेवटी पुढच्या पिढीतच अभिसरित होत असतात ना! मग आता सत्ता आणि अधिकार मिळाल्यानंतर 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' या न्यायाने अंतरंगातील हिंदू द्वेष, त्यानिमित्ताने रा. स्व. संघाचा द्वेष, सत्तारूढ पक्षाचा द्वेष आणि त्या संबंधातील साचलेली गरळ बाहेर पडेल नाही तर काय? तसला हा प्रकार चालू आहे असे समजावे, असे शिक्कामोर्तब करून, स्वत:च्या मनाचे समाधान करून 'मला काय त्याचे?'चा हिंदू समाजाच्या हाडीमांसी खिळलेल्या उदासीनतेने या आजच्या देशातील दिवसेंदिवस भविष्यकालीन भीषण यादवीकडे होणाऱ्या वाटचालीकडे दुर्लक्ष करणे हे योग्य ठरले काय? याचा विचार कुणी करणे गरजचे आहे? तर, याचे साधे, सरळ, सोपे उत्तर हेच आहे की, अनादिकाळापासून पुत्र रूपाने राहणाऱ्या हिंदू समाजालाच याचा मुळातून विचार करावा लागणार आहे. कारण, सहस्रावधी वर्षांपासून या देशाचा परिचय, नाव जगाच्या नकाशात 'हिंदुस्थान' हेच राहिले आहे. मुसलमानांचा ध्येयवाद, उद्दिष्ट त्याचे 'इस्लामीस्तान' म्हणजे 'दारूल इस्लाम' करण्याचा आहे. त्या दृष्टीने इंग्रजांच्या नव्हे, तर औरंगजेबाच्या मोगल राजवटीपासून त्यांचे अथक, अखंड प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नांचा मागोवा घेण्यानेच या प्रश्नाचे मूलभूत सत्य आपल्या लक्षात येऊ शकेल.

**मुस्लिमांचा ध्येयवाद :** संपूर्ण जगाचे 'दारूल इस्लाम'मध्ये रूपांतर करणे हा मुस्लिमांचा ध्येयवाद आहे. त्यानुरूप त्याला प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याचे अखंड प्रयत्न चालू असतात. या योजनेचा एक भाग म्हणून अन्य समाजातील लोकांचे धर्मांतर घडविणे, दीन-दरिद्री लोकांच्या परिस्थितीचा फायदा घेणे, जोरजबरदस्तीने अन्य धर्मीयांच्या स्त्रियांना बलात्कारित करणे, पळवून नेणे, एकापेक्षा अनेक विवाह करण्याची मुभा त्यांना असल्याने त्याचा लोकसंख्यावृद्धी या एकाच उद्दिष्ट्यपूर्तीसाठी वापर करणे; त्यातून आपल्या धर्माची टक्केवारी वाढवून लोकसंख्येचे असंतुलन निर्माण करणे, त्या 'व्होट बँकेचा' नीट राजकारणाच्या दृष्टीने कुशलतेने वापर करून देशातील राजकारणावर प्रभाव टाकणे त्यासाठी त्या त्या देशातील मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून स्वत:चे अस्तित्व जाणीवपूर्वक पृथक म्हणजे स्वतंत्र ठेवणे, जसे अनादिकाळापासून भारताचा राष्ट्रीय प्रवाह हिंदुत्वाचा आहे तर तो न मानता भारतात हिंदू आणि मुस्लिम असे दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत, अशी आग्रही मांडणी करून द्विराष्ट्र सिद्धांताची निर्मिती करणे. हिंदू समाजाच्या दुर्दैवाने फाळणीच्या रूपाने त्यांच्या या ध्येयवादाला, सत्तेसाठी आसुसलेल्या, हपापलेल्या, इंग्रजांच्या 'तोडा-फोडा आणि झोडा' या कुटिलतेला बळी पडलेल्या त्यावेळच्या आमच्या 'महान नेत्यांनी' घवघवीत यश प्रदान केले. पाकिस्तानकडून अखंडपणे होणारा आतंकवाद्यांचा त्रास आणि बांगलादेशातून अवैध होणारी घुसखोरांची संख्या, त्यामुळे बॉर्डर क्षेत्रात, आसाम प्रांतात बिघडलेले लोकसंख्येचे संतुलन, यामुळे अखंडपणे त्या जखमा रक्ताळलेल्या ठेवण्याचा असुरी आनंद मुसलमान राज्यकर्ते घेत असतात. नागराजन या तरुणाला अनेक गुंड भरदिवसा शेकडो लोकांच्या उपस्थितीत लोखंडी रॉडने ठोकत असताना केवळ बघ्याची भूमिका घेणारा असा हा 'सेक्युलरवादी' सर्वधर्मसमभाव जोपासणारा आपला हिंदू समाज! असंघटित, प्रतिकारशून्य, शक्तिहीन आणि 'शत्रुमित्र विवेकशून्य असणारा. मोपल्यांच्या बंडाच्या वेळी सहस्रावधी हिंदूंचा 'कत्ले आम' करणाऱ्या, सहस्रावधी हिंदू स्त्रियांवर बलात्कार करून त्यांचे धर्मांतर करणाऱ्या व त्यांना केवळ भोगदासीचे जीवन देणाऱ्या मोपल्यांचे कौतुक महात्मा गांधींनी केल्याचा इतिहास आपण जाणतोच. त्याच काळात त्यांनी 'हिंदूंना मरा पण प्रतिकार करू नका,' असा सल्लाही दिला होताच ना? कालपुरुष जीवाच्या आकांताने तळमळून सांगतो आहे की, ''हिंदूंनो, रात्र वैऱ्याची आहे जागे राहा.'' या सर्व गोष्टींचा वर वर विचार करू नका. ही इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. द्वापारयुगात महर्षी वेद व्यासांनी महाभारत लिहिले. ते द्रष्टा होते. म्हणून 'व्यासोच्छिष्ट जगत सर्वम्' असे त्यांनी लिहिलेल्या महाकाव्याबद्दल म्हटले जाते. त्याचा अर्थ चांगल्या आणि वाईट वृत्तींचा संघर्ष ज्याला भगवद्‌गीतेने 'दैवी असुरी संपदा' म्हटले आहे, युगानुयुगे अखंडपणे चालत असतो. परिस्थितिजन्य त्याचे स्वरूप, साधने, पात्र बदलत असतात. त्याचे मूळ स्वरूप लक्षात घेतले तरच योग्य दिशाबोध आणि मार्ग सापडतो. द्वापार युगातील महाभारताची पुनरावृत्ती विद्यमान 'भारतात' घडते आहे. त्यासाठी 'महाभारत ते भारत' या वाटचालीचा मागोवा आणि चिंतन करण्याची गरज आहे.

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

# लाडकी बहीण; सावत्र मतदार!

**प्रफुल्ल क. व्यास**

राज्यातील महिलांसाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना सुरू केली. अगदी घरच्या लाडक्या बहिणींना जसा त्रास होऊ नये म्हणून वेळोवेळी भाऊ काळजी घेतो तशी काळजी घेत त्यातील अटी व शर्थी बाजूला करण्यात आल्या. ही योजना तशी आपल्या शेजारच्या मध्यप्रदेशात प्रचंड यशस्वी झाल्यानंतर महाराष्ट्रात लागू करण्यात आली. 'चांगले ते घेत जावे' या उक्तीने या योजनेचे स्वागतही व्हायलाच हवे. मात्र, विरोधकांना ही योजना पचनी पडणे शक्य नव्हते. त्यांनी लाडका भाऊ काढण्याची मागणी केली आणि राजकीय धुरंधर असलेल्या फडणवीसांच्या या सरकारने लाडका भाऊ योजना काढून विरोधकांची तोंडं चूप केली.

विरोधक चूप होतीलही. पण, समाजमाध्यमांवर या योजनेची तेवढीच खिल्लीही उडवली जात आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही योजना आल्याने 'समजदार को इशारा काफी है' असे मतदारांचे झाले आहे. काही देशांमध्ये वैद्यकीय आणि शिक्षण या दोन्ही सेवा सरकार राबवते. त्या उलट भारतात या दोन्ही सेवांवर केंद्र आणि राज्य सरकारचे निर्बंध नसल्याने पैशांची 'व्हाईट कॉलर' लुटमार सुरू आहे. या देशात मोदी यांच्या नेतृत्वातील १० वर्षे, अटलबिहारी वाजपेयी, असे अधलेमधले सरकार सोडले तर जास्तीत जास्त काळ काँग्रेस किंवा काँग्रेसच्या विचारांचे सरकार राहिलेले आहे. याच सरकारने मतांचे राजकारण करण्यासाठी 'मोफत योजना' सुरू केल्या. त्या योजना पुढे सुरू ठेवण्याची जबाबदारी पुढच्या सरकारची असते. त्या फुकट्या योजना बंद केल्या की ते सरकार गरिबांच्या कसे विरोधी आहे, हे समजावून सांगण्यासाठी अनेक तज्ज्ञ याच समाजात आहेत. त्यामुळे फुकट्या योजनांची या देशात कमतरता नाही. बरं, बरेचदा असे म्हटले जाते की, सरकार राजकारणासाठी म्हणा वा मतांवर डोळा ठेवून या योजनांची अंमलबजावणी करते. तर मग कोरोनानंतर देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांना प्रतिव्यक्ती ५ किलो गहू, ३ किलो तांदूळ, १ किलो साखर तर केसरी कार्ड असलेल्यांना ४ किलो तांदूळ आणि १ किलो गहू मोफत दिला जातो. ही योजना केंद्र सरकारच्या वतीने राबविली जाते. याशिवाय घरकूल योजनाही राबविली जात आहे. कुडाच्या, पडक्या घरात राहणाऱ्यांना सिमेंटच्या घरात राहण्याचे भाग्य लाभते आहे. तरीही चालू अधिवेशनात आमच्या वर्धेच्या खासदारांनी घरकुलाच्या तेवढ्या दीड लाखात घरचे शौचालयही होत नसल्याचा आरोप केला. अशाच अनेक सरकार विरोधी चर्चा होत गेल्याने भाजपा सरकारला लोकसभा निवडणुकीत जागांचा धक्का बसला. केंद्रातील भाजपा सरकारने अनेक योजना गरिबांसाठी राबवल्या तरीही या योजनांचा लाभ घेणाऱ्यांनी लाभ देणारे सरकार येण्यासाठी बोटाला शाई लावून घेण्याची कृतज्ञता दाखवली काय? या प्रश्नाचे उत्तर शंभर टक्के नकारार्थीच राहील. मतदान हा प्रत्येकाचा हक्क आहे हे जेवढे सत्य आहे त्यासोबत आपल्याला ज्याने भरभरून दिले त्याला त्या बदलीत काही तरी देणे ही आपली संस्कृती आहे. परंतु, यावेळी मतदान करताना कृतज्ञतेपेक्षा कृतघ्नांची संख्या जात झाल्याचे दिसून आले. त्याला अनेक कंगोरेही आहेत. पण, सरसकट दिल्या जात असताना मध्यमवर्गीयांचा म्हणजे २५ ते ४० हजार वेतन कमावणाऱ्यांचा विचार कोणतेही सरकार करताना दिसत नाही. मोफत देत असताना कररूपाने ते आमच्याच खिशातून काढल्या जात असल्याची सामान्य लोकांची भावना आहे. त्यामुळे राज्यात लाडकी बहीण म्हणा वा लाडका भाऊ या योजनेचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीत होऊ शकेल का, याचा विचारही केला जावा. मध्यप्रदेशात कोणी शरद पवार, उद्धव ठाकरे वा संजय राऊत नव्हते. त्यामुळे तिथले राजकारण वेगळे आहे. महाराष्ट्रात तर कट-काटशहाचे राजकारण सुरू आहे. आजच नाही का बाळासाहेबांच्या वारसदारांनी एक तर मी राहील किंवा देवेंद्र फडणवीस राहील, अशी थेट धमकीच दिली. दोन दिवसांपूर्वी राहुल गांधींना संसदेत अभिमन्यू आठवला. त्याआधी संविधान आठवले होते. लोकसभा निवडणुकीत वर्धा जिल्ह्यात महाविकास आघाडीचा एक छुपा गट आतून 'प्रबोधन' मोहीम राबवत होता. इतर मतदार संघातही वेगवेगळ्या नावाने झाले असेल. याची कल्पना कोणालाच नव्हती. लोकसभेचे निकाल जेव्हा लागले तेव्हा सर्व गोष्टी डोळ्यापुढे आल्या. मतदारांना सरकारी योजना कितीही मोफत दिल्या तरी ते आपले होत नाहीत, हे सरकार लक्षात कधी घेईल आणि त्यांना मोफत देत असताना मध्यमवर्गीयांनी खिशाला कात्री काय म्हणून लावून घ्यावी. तुम्ही लाडकी बहीण आणा की मोफत घरं द्या, मतदार वेळप्रसंगी सावत्र होतात हे लोकसभा निवडणुकीच्या निकालाहून समजून घ्यायला राजकारण्यांना वेगळे सांगण्याची गरज नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला रास्त भाव, पेट्रोल, डिझेल व गॅसचे भाव कमी होणे हेच विजयाचे सूत्र असेल याची खबरदारी घ्यायला हवी; नाही तर मतदार सावत्रच असतात.

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

# फडणवीस संपत नसतात, तू संपशील...

**मोरेश्वर बडगे**

सार्‍याच राजकीय पक्षांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणूक लागेल. तसे झाले तर पुढच्या महिन्यात आचारसंहिता लागू शकते. त्या आधी हातची कामे उरकायची सत्ताधाऱ्यांना घाई असणार. त्या हिशोबाने प्रत्येकाने मोर्चेबंदी सुरू केली आहे. डाव-प्रतिडाव आखले जात आहेत. आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. यावेळचे चित्र मोठे विचित्र आहे. लोकसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाआघाडी असा थेट सामना झाला. विधानसभा निवडणुकीत विविध राजकीय पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांची बहुरंगी जत्रा रिंगणात उतरलेली दिसेल. भाजपा, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे प्रत्येकी दोन गट, वंचित आघाडी, अकोल्याचे तुपकर, अमरावतीचे बच्चू कडू यांच्या आघाड्या, एमआयएम याशिवाय शेकड्याने बंडखोर तुम्हाला मैदानात दिसतील. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हेही पाडायचे की लढायचे, याचा निर्णय लवकरच जाहीर करतील. एकूणच खूप सारे उमेदवार आखाड्यात उतरलेले असतील. त्यामुळे कोणाला मत द्यायचे, हा मतदारांपुढे मोठा प्रश्न राहणार आहे. महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुप्रीमो राज ठाकरे हेही यावेळी मैदानात उतरले आहेत. त्याची झलक अकोल्यात दिसली. या निवडणुकीत तुम्हाला खूप राडे पाहायला मिळतील. कारण राजकारण आता विचारधारेचे राहिलेले नाही. शक्तिप्रदर्शनाचे माध्यम बनले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर विधानसभा निवडणूक होत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाला तडाखा बसला; '४१ पार' करता आले नाही. महाविकास आघाडीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या तर १० पैकी ८ जागा जिंकून शरद पवारांनी सर्वाधिक स्ट्राईक रेट गाठला. मुस्लिम मतांच्या जोरावर ठाकरे सेनेने मुंबईतल्या चार जागा काढल्या. यावेळी मुस्लिम व्होट बँक त्यांना साथ देईलच अशातला भाग नाही. त्यामुळे की काय, उद्धव ठाकरे अस्वस्थ आहेत. पण त्यांनी अंगात आणावे असे काहीही घडलेले नाही. महायुतीला फक्त १७ जागा मिळाल्या. मात्र मतांच्या बाबतीत फक्त दोन लाख मतांचा फरक आहे. वंचित आघाडी लोकसभेत चालली नाही. मात्र विधानसभेत धूम करू शकते. मुंबई-पुण्याच्या मराठी पट्ट्यात मनसेची ३ ते ६ टक्के मते मोठ्यामोठ्यांची बंडी उलार करू शकते. राजू शेट्टी, एमआयएम आणि सपा यांचीही स्वत:ची प्रभाव क्षेत्रे आहेत. शिवाय मराठा फॅक्टर म्हणजे जरांगे आहेच. यावेळेस महाविकास आघाडी एकत्र लढेल काय? शक्यता कमी वाटते. कारण प्रत्येकाला सीएम व्हायचे आहे. मुंबईमध्ये नुकत्याच झालेल्या शाखाप्रमुखांच्या मेळाव्यातील उद्धव ठाकरे यांचे भाषण अतिशय आक्रमक होते. उद्धव यांच्या भाषणात टोमणेबाजी, शिवीगाळ यांची भरमार असते. हे भाषणही वेगळे नव्हते. मात्र या भाषणात त्यांनी सभ्यतेच्या साऱ्या मर्यादा ओलांडल्या. 'एक तर तू राहशील, नाहीतर मी राहीन,' अशा भाषेत उद्धव ठाकरेंनी भाजपाचे राज्यातील सर्वोच्च नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आव्हान दिले. 'मला आणि आदित्यला तुरुंगात डांबण्यासाठी फडणवीसांनी डाव खेळले,' असा गंभीर आरोप त्यांनी शरद पवार गटाचे नेते आणि तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांचा आधार घेत केल्याने एकच खळबळ माजली. 'फडणवीसांनी मला कागद दिले होते. त्यावर सह्या करायला सांगितले होते. मी त्यावर सह्या केल्या असत्या तर ठाकरे पितापुत्र जेलमध्ये असते,' असा दावा करताना देशमुखांनी पेनड्राईव्हही दाखवला. 'अनिलबाबू हे शरद पवार आणि उद्धवबद्दल काय बोलतात त्याचा मसाला आपल्याकडेही आहे. योग्य वेळी तो बाहेर काढू,' अशा भाषेत फडणवीसांनी ठणकावले. दोघांकडेही पेनड्राईव्ह आहे. मात्र दोघेही दाखवायला तयार नाहीत. लोकसभेत लोकांनी हात दिला म्हणून महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे, पण लोकसभेची निवडणूक आणि विधानसभेची निवडणूक वेगळी असते, तिथले प्रश्न वेगळे असतात. संविधान बदलवण्यासाठी भाजपाला जागा हव्या आहेत, असा नॅरेटिव्ह विरोधकांनी चालवला. लोक त्या प्रचाराला भुलले. पण आता विधानसभा निवडणूक आहे. इथे स्थानिक प्रश्न असतात. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी हवेत उडू नये; आणि एक सांगू का? ठाकरेंनी फडणवीस यांना संपवण्याची भाषा करणे म्हणजे कावळ्याने गरुडाला आव्हान देण्यासारखे आहे. फडणवीस हे एकटे नाहीत. फडणवीस ही व्यक्ती नाही, संस्था आहे, शक्ती आहे. त्यांच्या पाठीशी नरेंद्र मोदी आहेत,



अमित शाह आहेत, संपूर्ण भाजपा पक्ष आहे. फडणवीसांना संपवणे तर दूर; त्यांच्या केसापर्यंतही ते पोहोचू शकत नाहीत. स्वत:चे ४० आमदार सांभाळू शकले नाहीत ठाकरे आणि लंब्याचवड्या गप्पा मारतात. महाआघाडीचे सरकार २५ वर्षे टिकेल, असे संजय राऊत म्हणाले होते. २५ महिनेही टिकले नाही. उद्धव यांना अलिकडे पंतप्रधानपदाची स्वप्न पडत आहेत. त्यांनी शरद पवारांना अजून ओळखलेच नाही, असे म्हटले पाहिजे. लिहून ठेवा. उद्धव यांचा सर्वात मोठा शत्रू शरद पवार असतील. ठाकरेंना मुख्यमंत्री करण्यासाठी शरद पवार या वयात घाम गाळत नाहीत. त्यांना आपल्या मुलीला मुख्यमंत्रिपदी बसलेले पाहायचे आहे. काँग्रेसला घेऊन ते वेगळे जुगाड जमवू शकतात. तिकडे काँग्रेसचे नाना पटोले यांनाही मुख्यमंत्री व्हायचे आहे. दोन उपमुख्यमंत्री करू शकतात. मात्र, मुख्यमंत्री एकच असतो. इथे तर तिघे तिघे टपून आहेत. तिकडे मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण हवे आहे आणि त्यासाठी त्यांनाही सत्ता हवी आहे. पण आता ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष होणार आहे. सगळेच मराठे हे जरांगे यांचे समर्थक नाहीत हे आता हळूहळू उघड होऊ लागले आहे. जरांगे यांची पूर्वीसारखी परिस्थिती राहिलेली नाही. प्रसाद लाड, आशिष शेलार, दरेकर हे मराठा नेते तर उघडपणे मैदानात उतरले आहेत. मतांचे ध्रुवीकरण झाले तर तिकडे ओबीसी व्होट बँकही एकगठ्ठा मतदान करू शकते, हा धोका आता मराठ्यांच्याही लक्षात येऊ लागला आहे. त्यामुळे जरांगे किती जागा निवडून आणू शकतील यावर मराठा समाजातच खल सुरू झाला आहे. या वादात विरोधी पक्ष स्वत:चे हात भाजून घेऊ इच्छित नाहीत. उद्धव ठाकरेंनी दिल्लीत मोदींकडे बोट दाखवले आहे. उशिरा का होईना, शरद पवारांनी या वादात उडी घेतली आहे. मराठा मतदारांची संख्या २८ टक्के आहे. तिला सोबत ठेवण्याच्या नादात जरांगेंनी फडणवीस आणि भाजपाला लक्ष्य करणे सुरूच ठेवले तर ही चाल बूमरँग होऊ शकते. ओबीसींचेही ध्रुवीकरण होऊन भाजपाला लाभ होऊ शकतो.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### हा केवळ थिल्लरपणाच!

आई होणे ही कोणत्याही स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात मोठी गोष्ट असते. आपण आई होणार हे कळल्यावर त्या स्त्रीला आसमान ठेंगणे होते. परंतु भारतीय माता आता पाश्चात्त्यांनाही वरचढ ठरलेल्या आहेत. वर्धा येथे 'टेस्ट ट्यूब बेबी' म्हणजे कृत्रिम गर्भधारणेद्वारे गर्भवती झालेल्या महिलांसाठी 'अभिनव फॅशन शो'मध्ये एकूण २३ गर्भवती महिला सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेच्या पहिल्या फेरीमध्ये गर्भवती मातांनी 'रॅम्प वॉक' म्हणजे मंचावरून विशिष्ट हावभाव करत चालत जाणे हा प्रकार केला तर दुसऱ्या फेरीमध्ये स्त्रीत्व आणि मातृत्व यांच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. विजेत्या ठरलेल्या मातांना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. भारतामध्ये गर्भवती स्त्रीकडे समाज आदराने बघतो आणि तिची काळजी पण घेतो. गर्भवती महिलेला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, ती सुरक्षित राहावी यासाठी आवर्जून लक्ष दिले जाते. मात्र, गर्भवती महिलांसाठी अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणे हा केवळ दिखाऊपणा किंवा थिल्लरपणा आहे. गर्भवती मातांनी अशा स्पर्धांमध्ये भाग घेण्यापेक्षा या काळात धर्मग्रंथांचे वाचन करणे, नामजप करणे, मंदिरात जाऊन देवी-देवतांचे दर्शन घेणे असे काही केल्यास जन्माला येणारे बाळ हे सात्त्विक होऊ शकते.

**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

●● ●●

### धोकादायक कोचिंग सेंटर्स

मुसळधार पाऊस पडल्यामुळे राजधानी दिल्ली येथे पूरस्थिती निर्माण झाली. जुने राजेंद्रनगर भागामध्ये ठिकठिकाणी पाणी साठले होते. हा परिसर मुख्यत्वे केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेच्या कोचिंग सेंटर्ससाठी प्रसिद्ध आहे. या भागातील या एका कोचिंग सेंटरच्या तळघरात २७ जुलै रोजी पाणी साठल्यामुळे अनेक विद्यार्थी अडकून पडले. या साठलेल्या पाण्यामध्ये तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. राज्यसभेचे सभापती असणारे उपराष्ट्रपती जयदीप धनकड यांनी यावर राज्यसभेमध्ये टीका केली. हे कोचिंग सेंटर्स विद्यार्थ्यांकडून अतोनात फी घेतात. पण त्यांना आवश्यक त्या सोयी पुरवू शकत नाहीत. कोचिंग सेंटर्स जाहिरातींसाठी कोट्यवधी रुपये खर्च करताना दिसतात. ज्या प्रमाणात विद्यार्थ्यांकडून फी घेतली जाते त्या प्रमाणात त्यांना सुविधा पुरवणे हे कोचिंग सेंटर्सचे कर्तव्य आहे. कोचिंग सेंटर्सच्या या बेजबाबदार प्रवृत्तीमुळे काहीतरी ध्येय मनाशी ठरवलेले हे तीन विद्यार्थी हकनाक जिवाला मुकले आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यापेक्षा या कोचिंग सेंटर्सला विद्यार्थ्यांच्या जिवाची किंमत शून्य आहे, असेच यावरून लक्षात येते. कोचिंग सेंटर्स म्हणजे विद्यार्थ्यांकडून पैसे उकळण्याचा एक मोठा धंदाच झाला आहे.

**भीमराव साळुंखे**/९४२३८६५९५०

●● ●●

### पार्किंग समस्या

रामदासपेठ, धंतोली-काँग्रेसनगर येथील पार्किंगची समस्या दूर होणे कठीण आहे. कमर्शियल जागा, दवाखाने यांचे प्लान संमत करताना पार्किंगला किती जागा सोडली किंवा किती जागा लागेल, याचा विचारच केला गेला नाही, असे वाटते. काही लोकांनी आपली घरे ही व्यावसायिक प्रतिष्ठाने, बँका यांना भाडेतत्त्वावर दिली आहेत. त्यांच्याकडे पार्किंगची जागा आहे की नाही, याची खातरजमा न करता त्यांना देण्यात आली का? त्यांच्या स्टाफला त्यांचीच वाहने पार्क करायला जागा नाही तर त्यांच्याकडे येणारे-जाणारे कुठे गाड्या पार्क करतील. तसेच जुने घर तोडून तिथे मोठमोठ्या इमारती, फ्लॅट स्कीम तयार झाल्या. त्या ठिकाणी येणारे व्हिजिटर्सना रस्त्यावर गाड्या लावाव्या लागतात. कारण व्हिजिटर्सना आत गाड्या लावता येणार नसल्याचे बोर्ड लावले आहेत किंवा चौकीदार आत गाडी लावू देत नाही. असे का? सर्व अपार्टमेंट-फ्लॅट स्कीमवाल्यांना त्यांच्याकडे येणाऱ्यांच्या गाड्या आत लावायला सांगा किंवा तशी सोय करायला सांगा अथवा त्यांच्यावर कारवाई करायला सांगा. कोर्टाने आदेश दिला की थातूरमातूर कारवाई होते. काही दिवस गेले की पुन्हा जैसे थे... रामदासपेठ येथील अर्नेजा हॉस्पिटल, हॉटेल सेंटर पॉईंट, तुली इम्पेरियल भागातील दवाखान्यांवर विशेष प्रेम दिसते; त्यांच्यावर कधीच कारवाई केली जात नाही. ज्या ठिकाणी बेसमेंटमध्ये पार्किंगची व्यवस्था आहे तेथे गोडाऊन बनवून ठेवले आहेत. कुठल्याही व्यावसायिक प्रतिष्ठानांना परवानगी देण्याआधी त्यांच्याकडे स्टाफ किती आहे, दिवसभरात येणारे-जाणारे किती असतील याचा विचार करून परवानगी द्यायला हवी. ज्यांनी आपल्या राहत्या घरात व्यावसायिकांना जागा भाडेतत्त्वावर दिल्या, त्यांना एनओसी कुठल्या तत्त्वावर दिली. रेसिडेंशियल भागात व्यावसायिक परमिशन कुठल्या आधारावर दिली, याची शहानिशा होणे जरूरी आहे. पार्किंगची सोय आहे की नाही, याची पाहणी जरूरी आहे; तसे नसल्यास त्यांच्यावर सतत कारवाई होणे जरूरी आहे. गोरक्षणच्या समोर पार्किंगसाठी जागा बनविण्यात आली. तेथे संपूर्ण जागेवर बॅट-टेबल विक्रेते बसले आहेत तसेच झाशी राणी चौक ते अलंकार चौक येथील फूटपाथवरील अतिक्रमण जे आहे त्यांच्यावरसुद्धा थातूरमातूर कारवाई होऊन दोन दिवसांनी पुन्हा जैसे थे. कोर्टाचे आदेश असतानासुद्धा हे होते. 'कंटेम्प्ट ऑफ कोर्ट'ची कारवाई करा नागपूर महानगर पालिका किंवा संबंधित संस्थांवर, अशी विनंती आहे.

**आशिष नाईक**/९८२३१७८७६७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महसूली अधिकारी कर्मचाऱ्यांवर राज्य शासनाचा अधिकचा विश्वास: जिल्हाधिकारी


**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑगस्ट**

महसुली अधिकारी कर्मचाऱ्यांवर राज्य शासनाचा अधिकचा विश्वास असल्याने कुठले आहे महत्त्वकांक्षी शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांची सेवा शासन घेत असते असे, गौरव उद्गार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी महसूल दिनाच्या कार्यक्रमानिमित्त प्रतिपादित केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात महसूल दिनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यावेळी श्री पाठक बोलत होते. या कार्यक्रमास प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी,उपविभागीय अधिकारी कविता जाधव, ओंकार देशमुख उपस्थित होते.महसूल दिनानिमित्त दूरदृष्टी प्रणालीच्या माध्यमातून महसूल दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमास विभागीय आयुक्त, सर्व जिल्ह्यांची जिल्हाधिकारी ऑनलाइन उपस्थित होते. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील महसूल अधिकारी कर्मचारी उपस्थित ऑनलाइन उपस्थित होते. मंत्री महोदयांचे मार्गदर्शन सर्वांनी एकले.तत्पूर्वी जिल्ह्यातील महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी ही पाठक म्हणाले, महसूलचे कर्मचारी हे शासनाचे हुकुमी एक्के असल्याने त्यांच्याकडून राज्यस्तरावरील महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणीचे कार्य केले जाते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना जिल्ह्यातील महिला भगिनींसाठी उपयोगी ठरणारी योजना असल्याने ज्या महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना याबाबतची जबाबदारी सोपवलेली आहे त्यांनी ही जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना गोरगरिबांची सेवा करण्याची संधी आपल्या कामानिमित्त मिळत असते त्यामुळे त्यांना गरजू लोकांचे अप्रत्यक्षपणे आशीर्वादही मिळतात, असेही ते यावेळी म्हणाले.कार्यक्रमाची प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले, महसूल दिनाचे महत्त्व उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी सांगितले, अन्न व नागरी पुरवठा विभागातील योजनांची माहिती उपविभागीय अधिकारी ओमकार देशमुख यांनी दिली. या कार्यक्रमास तहसीलदार, नरेंद्र कुलकर्णी, तेजस्विनी जाधव, अविनाश शिंगटे, सहाय्यक निबंधक श्री. आटूळे यांच्यासह नायब तहसीलदार, महसूलचे कर्मचारी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांकडून बीड शहरवासीयांची दिशाभूल-माजी.आ.सय्यद सलीम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑगस्ट**



पाणी असुनही आणि पाणी पुरवठ्याची योजना पुर्ण होवूनही केवळ वीज बिलाच्या थकबाकीपोटी बीडकरांना पाणी मिळत नाही. त्यामुळे वीजबिल भरण्यासंदर्भात शासनस्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने माजी आ.सय्यद सलीम यांनी केंद्राच्या 'हर घर जल, हर घर नल' या महत्वकांक्षी अशा जलजीवन मिशनच्या योजनेला हायकोर्टात आव्हान देत याचिका दाखल केली होती. या प्रकरणामध्ये हायकोर्टाने ११ जून २०२४ रोजी, राज्याच्या नगर विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना सर्व संबंधितांची बैठक दि.२९ जुलै रोजी घेण्याचे आदेशित केले होते. मात्र ही बैठक रद्द करून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ३१ जुलै रोजी व्ही.सी.द्वारे या मुद्यावर बैठक घेतली. मात्र या बैठकीत हायकोर्टाचा मुद्दा इतरत्र वळवत वांझोटी बैठक घेवून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पाणी प्रश्नावर तीन लाख नागरीकांची दिशाभूल करत राजकारण केल्याचा आरोप माजी आ.सय्यद सलीम यांनी केला आहे.

बीडचे माजी आ.सय्यद सलीम यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या पाणी प्रश्नाच्या बैठकीवरून वस्तुस्थिती दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. बीड नगर पालिकेकडे महावितरणची ३६ कोटी रूपयांची थकबाकी आहे. त्यामुळे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी २५ एमएलटी क्षमता असलेली पाणी पुरवठा योजना मंजुर असुनही त्यास महावितरणकडून अतिरीक्त वीज कनेक्शन मिळत नाही. यामुळेच सध्या पाणी असुनही शहरात कुठे दहा - बारा दिवसाला तर कुठे पंधरा ते वीस दिवसाला पाणी पुरवठा होत आहे. सदरील मुद्यावरून माजी आ.सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहीत याचिका दाखल केली होती. त्यांच्या याचिकेची दखल घेवून न्यायालयाने दि.११ जुन २०२४ रोजी बीड नगर पालिकेकडील वीज बील थकबाकीच्या विषयावर नगर विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना बैठक घेण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार ही बैठक दि.२९ जुलै २०२४ रोजी होणे नियोजीत होते. ही बैठक अचानक रद्द करून आ.संदीप क्षीरसागर आणि याचिकाकर्ते माजी आ.सय्यद सलीम यांना श्रेय जावू नये म्हणून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी हीच बैठक दि.३१ जुलै रोजी व्हिडीओ कॉन्फरंसींग द्वारे घेतली. या बैठकीतून निष्पन्न काहीच झाले नाही. केवळ इतरांना श्रेय नको म्हणून ओढून - ताणून ही बैठक घेण्यात आली. त्यातही जनहित याचिकेच्या अनुषंगाने हायकोर्टाने जे आदेश दिले आहेत. त्या आदेशाला बगल देवून ऐनवेळी विषय इतरत्र वळविण्यात आल्याचा आरोप माजी आ.सय्यद सलीम यांनी केला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने या पाणी प्रश्नावर प्रस्ताव तयार करून तो केंद्रातून जलजीवन मिशन योजनेशी संबंधीत विभागाला पाठवणे आवश्यक होते. मात्र दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याचे आश्वासन देण्यापलीकडे पालकमंत्र्यांनी या बैठकीत काहीच ठोस निर्णय घेतले नाहीत. हा विषय दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्याचा नसुन प्रशासकीय स्तरावर संबंधीत विभागाच्या अधिकार्यांच्या उपस्थितीत बैठक घेवून त्याचा प्रस्ताव केंद्राच्या जलजिवन मिशन योजनेशी संबंधीत विभागाकडे पाठवणे आवश्यक होते. परंतू केवळ राजकारण करायचे म्हणून जाणिवपूर्वक विषय इतरत्र वळवून बैठक घेण्यात आलेल्याचे माजी आ.सय्यद सलीम यांनी सांगितले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात साठे जयंती व टिळक पुण्यतिथी



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ ऑगस्ट**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज.जि. बीड. येथे दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी लोकशाहिर अन्नाभाऊ साठे जयंती व बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी परिसंवाद व चर्चासत्र घेवून संपन्न झाली.

सर्वप्रथम लोकशाहिर अन्नाभाऊ साठे व बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन, वंदन करण्यात आले.कमलाकर वैजनाथ साबळे, गणेश शगायकवाड, नितीन जगन्नाथ गायकवाड, हणुमंत भास्कर गायकवाड, ज्ञानेश्वर दशरथ गायकवाड, रामराजे सुधाकर गायकवाड, दादासाहेब जनक गायकवाड, नारायण बाजीराव गायकवाड, छगन आप्पाराव गायकवाड, रामराजे गोपीनाथ गायकवाड, गोविंद बालासाहेब गायकवाड, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.

त्यानंतर परिसंवाद व चर्चासत्र घेण्यात आली. या दोन्ही सत्रात गणेश गायकवाड, नितीन गायकवाड, हणुमंत गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, रामराजे गायकवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगन गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, यांनी मोलाचे मार्ग दर्शन केले.अध्यक्ष स्थानी कमलाकर साबळे हे होते. यावेळी बी. आर. पौळ, बबन पुंड, रामदास राऊत, धरणीधर गायकवाड, उद्धव गायकवाड, रावसाहेब जाधव चांच्यासह वाचकांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन ग्रंथालयाचे आनंद ( भैय्या) गायकवाड यांनी केले, तर आभार ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी मानले.

# नानाजी देशमुख विद्या मंदिर येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ ऑगस्ट**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर बीड येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी निमित्य १ ऑगस्ट गुरुवार रोजी कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेच्या सदस्य मा. श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी तसेच नानाजी देशमुख विद्यामंदिरच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ.अर्चनाताई मोराळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. त्यामध्ये कृष्णा रणखांब याने सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली तसेच फोटोला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी भाषणे केली. सौ मोराळे ताई यांनी लोकमान्य टिळकांबद्दल माहिती सांगितली. व सुनंदाताईंनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी कु. देवयानी कदम हिने कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम व्यवस्थित रित्या संपन्न झाला. कार्यक्रमाला उपस्थित नानाजी देशमुख विद्या मंदिरचे सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी वर्ग, आणि विद्यार्थी सर्वांचे सहकार्य लाभले.

# केज तालुक्यातील अवैध धंद्यांचा बंदोबस्त करावा
# शिवसेनेकडून उपोषणाचा ईशारा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ ऑगस्ट**

केज पोलीस स्टेशन व युसुफवडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याचे जाळे फोफावत चालले आहे.गुटखा-मटका ,अवैध गो-वाहतुक,अवैध दारू विक्री, अवैध वाळु उपसा,अवैध चंदन तस्करी,अवैध ऑनलाईन गेम, अवैध गांज्या विक्री व अनेक अवैध धंद्यामुळे कित्येकांना आपला जिव गमवावा तर लागतोच या व्यसनांमुळे कित्येकांची घरे उद्वस्त झाली आहेत.

अशा व्यसनापायी अनेक जन बेघर होऊन देशोधडीला वाहुन चुकीच्या मार्गाकडे लागत आहेत, अनेक युवक अश्या व्यसनांच्या नादी लागल्याने गुन्हेगारीच्या कुठल्याही थराला जात आहेत , गुन्हेगारी वाढण्यासाठी कारणीभुत ठरणाऱ्या अवैध दारू विक्री,गुटखा,मटका अशा प्रकारच्या



अवैध धंद्यावर पोलीसप्रशासणाच्या दुर्लक्षणामुळे फोफावत चाललेला हा केज पोलीस स्टेशन व युसुफवडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याचा सुळसुळाट ८ दिवसात बंद करण्याच यावा,अन्यथा दि. ०८/०८/२०२४ रोजी तहसील कार्यालय केज या ठिकाणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल असा ईशारा देण्यात आला.

स्वाक्षरी करून निवेदन देताना केज शिवसेना तालुकाप्रमुख अशोक जाधव,जिल्हासचिव रोहित कसबे,शहरप्रमुख तात्या रोडे,युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले,उपतालुकाप्रमुख सुभाष ठोंबरे,तालुका सचिव सखाराम वायबसे,ज्ञानेश्वर बोबडे,आप्पा कांबळे,पप्पू कोल्हे,रूषी घुले,बाबासाहेब देशमुख,पुरूषोत्तम घुले, नंदकिशोर गिते,कृष्णा केदार,अंगद देशमुख सह शिवसैनिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी गुणवत्तेसोबत सामाजीक बांधिलकी जोपासावी-ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे

## संत सावतामाळी मंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ ऑगस्ट**

अलिकडील काळात अधुनिक सुविधांमुळे विद्यार्थी,मुलांमध्ये सर्वांगीण ज्ञान संपादन करण्याची टक्केवारी वाढलेली आहे.ही गुणवत्ता साध्य करत असताना समाजाची बांधिलकी जोपासावी यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबरोबर संत साहित्याचे वाचन करावे असे प्रतिपादन ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे यांनी केले.

श्री संत सावता महाराज समाधी महोत्सवानिमीत्त संत सावतामाळी मंदिर परळी येथे सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात विविध परिक्षेत यश संपादन केलेल्या समाजातील विद्यार्थ्यांचा ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरु असुन या सप्ताहात सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.याअंतर्गत गुरुवार दि.१ ऑगस्ट रोजी रात्री ७ ते ९ या वेळेत ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे यांचे हरिकीर्तन पार पडले.यानंतर यावर्षी विविध परिक्षेत यश संपादन केलेल्या माळी समाजातील विद्यार्थ्यांचा पालकांसह ह.भ.प.रंधवे महाराजांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी इयत्ता १० वी मध्ये यश संपादन केलेल्या आदित्य जगन्नाथ वडुळकर,कु.समिक्षा



तानाजी लोखंडे,चि.श्रीनिवास पांडूरंग काळे,कु.मधुरा सचिन शिंदे,कु.समिक्षा ज्ञानेश्वर लोखंडे,चि. ओंकार नरहरी बनसोडे,अभिजित बालासाहेब लोखंडे,कु.अक्षरा दत्तात्रय लोखंडे,आदित्य महादेव लोखंडे,इयत्ता बारावी परिक्षेत यश संपादन केलेल्या कु.करूणा कोंडिबा वडुळकर,नीट परिक्षेत यश संपादन केलेल्या चि.प्रविण राजकुमार डाके या विद्यार्थ्यांचा पालकांसह गौरव करण्यात आला.

आज दिंडी सोहळा

संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी शहरातुन भव्य दिंडी सोहळा निघणार आहे. शनिवार दि.३ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता संत सावतामाळी मंदिर येथुन सावता महाराजांची पालखी मंगल कलश,ध्वज पताका, टाळ,विणा,मृदंग,बॅन्ड लेझीमच्या निनादात निघुन गणेशपार,नांदुरवेस,अंबेवेस,वैद्यनाथ मंदिर,संत सोपानकाका मंदिर,राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे संत सावतामाळी मंदिरात आल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त रक्तदान शिबीरात ७० जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१ ऑगस्ट**

संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरु असुन या निमीत्त बुधवार दि.१ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबीरात ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले.विशेष म्हणजे या रक्तदान शिबीरात महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदान केले.



संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात दि.२८ जुलै पासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे.या सप्ताहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,संत नामदेव महाराज समाधी सोहळा आदी सामाजीक,धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या अंतर्गत बुधवार दि.१ ऑगस्ट रोजी परळी येथील वैद्यनाथ ब्लड बँकेसाठी रक्तदान शिबीर घेण्यात आले.सकाळी ११ वाजता सुरु झालेल्या या शिबीरात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ७० जणांनी रक्तदान केले.यात प्रविण काळे,दत्ता लोखंडे, नेताजी लोखंडे,किशोर वडूळकर,भाविद लोखंडे,जगन्नाथ वडुळकर,चंद्रशेखर काळे,अमोल काकडे,रवी गव्हाणे,लखन गव्हाणे, सतीष हारकळ,सोहम पवार,मुंजा धुमाळ,नरहरी पाथरकर,दत्ता कोरे, सचिन गोरे,गजानन वाघमारे, बालासाहेब काळे,सौ.सुनिता सातपुते,सौ.रुपाली लोखंडे,सौ.उषा लोखंडे,सौ.जयश्री लोखंडे,सौ.संगीता शिंदे,सौ.राजकन्या डाके,सौ.ऐश्वर्या सुर्यवंशी,देवई गडगीळे,सौ.वर्षा बनसोडे,कु.तेजस्वीनी बनसोडे,सौ.वृशाली नवाले,सौ.रेणुका डाके,सौ वैष्णवी लोखंडे,सौ.मिरा लोखंडे,सौ.बबीता शिंदे,सौ,प्रमिला नाईकवाडे,सौ.रेखा लोखंडे,दत्तात्रय शिंदेसौ.अनिता माळी,अनिता लोखंडे,राजेश लोखंडे,बालासाहेब राउत,नारायण भोकरे,ज्ञानेश्वर खेत्रे,प्रसाद डाके,दशरथ गोरे,अमोल गायकवाड,प्रकाश लोखंडे,गणेश राऊत,अर्जुन खरोळकर,रवी कानडे,हनुमान बनसोडे,विलास लोखंडे,शिवाजी बनसोडे,गोपीनाथ डाके,अजय बनसोडे,शाम डाके,सुनिल देशमुख,भगवान जायम्हेत्रे,ज्ञानेश्वर लोखंडे,अशोक राऊत,सतीश लोखंडे,बंडू लोखंडे,बद्रीनाथ लव्हाळे,सचिन खेत्रे,अभिषेक खोसे आदींनी रक्तदान केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जिंतूरातील मुख्य रस्त्यावर झाडे लावा अन्यथा आंदोलन

### संभाजी ब्रिगेडचा सा.बा. विभागाला निवेदन

**जिंतूर,/प्रतिनिधी:** शहरातील मुख्य रस्त्यावर विविध सामाजिक संघटनेने लावलेली झाडे विकासाचा नावाखाली तोडण्यात आली होती दरम्यान झाडे तोडताना एका झाडाच्या बदल्यात पाच झाडे लावण्याच्या अटीवर न प प्रशासनाने परवानगी दिली मात्र अद्यापही संबंधीत कंत्राटदार व सा बा विभागाने झाडे लावण्याची तसदी घेतली नसल्यामुळे येत्याा आठ दिवसात रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावा अन्यथा आंदोलन छेडण्याचा ईशारा दिनांक २५ जुलै रोजी संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदनाद्वारे दिला आहे.

शहरातील अण्णा भाऊ साठे चौक ते यलदरी रोडवर दुतर्फा शहरातील सामाजिक संघटना, व्यापारी यांनी झाडे लावून जगविण्यात आली होती ही सर्व झाडे मोठी झाल्यावर शहरातील विकास कामासाठी झाडे तोडण्याचे काम हाती घेण्यात आले होते परंतु सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी झाडे तोडण्यास विरोध दर्शविला होता यावेळी मोठा संघर्ष निर्माण झाला असल्यामुळे तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले होते यामध्ये एका झाडाच्या बदल्यात पाच झाडे लावून जगविण्यात येतील असे सांगितले होते परंतु सध्या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्त्यावर कोठेही झाडे लावली नसल्यामुळे संभाजी ब्रिगेड संघटना आक्रमक झाली आहे याबाबत निवेदन देऊन येत्याा आठ दिवसात शहरातील रस्त्यावर दुतर्फा झाडे लावली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### गव्हाणे यांचा पदाधिकाऱ्यांशी संवाद

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील हे पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यानिमित्ताने जिल्हाध्यक्ष ॲड.गव्हाणे यांचा जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात दौरा आयोजित करण्यात आला आहे. बुधवारी त्यांनी पुर्णा, पालम, गंगाखेड, सोनपेठ येथे भेटी दिल्या. तसेच गुरूवारी (दि.२५) मानवत येथे सकाळी ११ वाजता, पाथरी येथे दुपारी १ वाजता, सेलू येथे दुपारी ३ वाजता आणि जिंतूर येथे सायंकाळी ५ वाजता पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी घेवून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच परभणी विधानसभा ग्रामीण आणि शहरी पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना दि. २६ जुलै रोजी ॲड.गव्हाणे हे मार्गदर्शन करणार आहेत. या जिल्हा दौऱ्यात आजी, माजी आमदार, तालुकाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, सर्व सेलचे पदाधिकारी, महिला, युवक आदींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सरचिटणीस रमाकांत कुलकर्णी यांनी केले आहे.

### ओबीसी अधिकारी-कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन- ११ ऑगस्ट रोजी आयोजन : विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार

**परभणी,/प्रतिनिधी :** मंडल दिवसाचे औचित्या साधुन ११ ऑगस्ट रोजी ओबीसी अधिकारी-कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन व एकदिवसीय चिंतन शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

नवी मुंबईतील एमटीडीसी सभागृहात आयोजित केलेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष माजी आमदार व मंडल स्तंभाचे निर्माते डॉ. नारायणराव मुंढे, कार्यक्रमाचे उदघाटक व वक्ते म्हणून ओबिसी आंदोलनाचे अभ्यासक, भारतीय राजकीय सिद्धांतकार व लेखक प्रा. डॉ. कांचा इलैया तसेच प्रमुख वक्ते म्हणून संशोधक विद्यार्थी टीस, मुंबईचे यशवंत झगडे हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून ओबीसी अधिकारी-कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष व उपजिल्हाधिकारी सुनिल शेळके हे असणार आहेत.

### टि.सी.हरवली आहे.

**माझी जयस्वाल रूपाली बजरंगलाल या नावाची बीए तृतीय वर्षे पासची टी.सी. पूर्णा बसस्थानक परिसरात हरवली आहे. कृपया कोणाला सापडल्यास खालील क्रामंकावर संपर्क साधावा.**

**मो.९३७१५ १७६२५**



# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थी महिलेला मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत करणार- आ.डॉ.रत्नाकर गुट्टे

**पूर्णा ,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारने महिलांसाठी सुरु केलेली महत्वपुर्ण योजना ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'' या योजनेच्या अंमलबजावणीसाठी तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक यांचे प्रशिक्षण शिबीर व कार्यशाळा गंगाखेड विधानसभेचे आमदार डॉ. रताकर गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत पूर्णा येथे बुधवारी राजाराम बापू सभागृह येथे संपन्न झाली.

येथील राजारामबापू सभागृहाची अवस्था पाहता पूर्णा नगरपालिकेचे प्रशासक उपविभागीय अधिकारी युवराज डापकर यांनी या कार्यक्रमात सभागृह दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार डॉ. रताकर गुट्टे यांच्याकडे केली असता त्याांनी या सभागृहासाठी दुरुस्ती व देखभाल साठी



एक कोटी रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन आमदार गुट्टे यांनी दिले.

या कार्यक्रमासाठी उपस्थित, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल जाधव, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसिलदार माधव बोथीकर, गटविकास अधिकारी मयुर आंदेलनवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिनगीने, मित्रामंडळाचे तालुकाध्यक्ष गणेश कदम, प्रभारी सुभाष देसाई, युवक तालुकाध्यक्ष मारोती मोहिते, ऋषीकेश सकनुर, प्रशांत कापसे,मारोती मोहिते महागावकर, बळीराम कदम दत्तराव पौळ,बालाजी रुद्रवार, विश्वनाथ होळकर यांच्यासह,पत्राकार,तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, गट प्रवर्तक, माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्याा.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनीषा काळे यांनी तर संचलन आभार विद्या भालेराव यांनी केले.

## सोनपेठात संततधार पावसामुळे पिकांचे नुकसान

**सोनपेठ,/प्रतिनिधी :-** गेली आठवड्यापासून सोनपेठ तालुक्यात सर्वत्र संततधार पावसाची रिपरिप सुरू आहे. त्याामुळे शेतीत पुरेशी ओल होऊन दररोजच्या पावसामुळे उगवलेली सर्वच पिकं पिवळी पडू लागली आहेत. सखल भागात पाणी साचल्यामुळे कपाशीच्या पीकांना मर लागली असल्याचे पहावयास मिळत आहे.

यावर्षी जून महिन्यातच पेरणीलायक पाऊस झाल्यामुळे तालुक्यात सर्वत्र खरिपाची पेरणी करण्यात आली आणि पिकेही जोमदार उगवली. मध्यंतरी पावसानं थोडा काळ उघडीप दिल्याने शेतकरी चिंतेत पडले होते, परंतु पुन्हा जुलैमध्ये दुसऱ्याच आठवड्यात पावसाने हजेरी लावली आणि दोन-तीन पावसं बऱ्यापैकी पडली.पा-



वसामुळे शेतीच्या सखल भागामध्ये पाणी साचले होते. परंतु त्याानंतर संततदार पावसाचा जोर वाढला आणि गेल्या आठवडा भरापासून सोनपेठ तालुक्यात सर्वत्र रात्रांदिवस संततधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे शेती पिकांच्या मशागतीची कामे ठप्प झाली असून शेतीमध्ये वाफसा होत नाही.जोमाने आलेली कापूस, सोयाबीन, मूग, उडीद, तुर आदी खरिपाची पिकं आता पाण्यामुळे पिवळी पडून सुकू लागली आहेत. तर पिकांमध्ये पाणी साचलेल्या ठिकाणी कापसाच्या पीकांना मात्र मर लागली आहे.

या पावसामुळे लहान नाल्यांना पाणी वाहू लागले असून विहीर, बोर, पाझर तलाव व शेततळ्यातील पाण्याची पातळी वाढतांना दिसत आहे. असाच पाऊस आणखी पुढे सुरू राहिल्यास खरिपाची जोमदार आलेली पिकं मात्र हातची जाण्याची शक्यता शेतकरी वर्गातून वर्तवली जात आहे.

## जिंतूर ते वरुड बस सेवा चालू करण्याची मागणी

**जिंतूर,/प्रतिनिधी:** गेल्या अनेक दिवसापासून वरुड येथील नागरिकांची बस चालू करा अशी मागणी होती परंतु बस चालू झाली नाही वरुड येथील गावकरी व माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र थिटे यांनी आ. मेघना साकोरे यांच्याकडे मागणी



केली असता त्यांनी जिंतूर आगारास पत्र देऊन मागणी केली ती मागणी आगारप्रमुखांनी तात्काळ मान्य केली.

वरुड येथील गोरगरीब विद्यार्थी ज्या विद्यार्थ्यांना जिंतूरला येण्याकरता सुद्धा पैसे नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी त्याा विद्यार्थ्यांचे आई-वडील मोलमजुरी करून खाणारे असल्यामुळे त्याांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे ते शाळेत येऊ शकत नाही याची दखल घेऊन माननीय राजेंद्र भाऊ थिटे यांनी आमदार सौ मेघनाताई बोर्डीकर यांच्याकडे मागणी केली असता त्याांनी ती तात्काळ मान्य केली व आज प्रत्याक्षात जिंतूर ते वरुड बस सेवा चालू झाल्यामुळे वरुड येथील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे एसटी महामंडळाचे आगर प्रमुख श्री चीभडे साहेब संदीप भांबळे व चालक वाहक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेलूत मटका नावाचा जुगार जोमात; अवैध धंद्याला वरदहस्त कोणाचा?

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरासह ग्रामीण भागात कल्याण मूंबई नावाचा मटका जूगार जोमात असल्याने अवैध धंदेवाल्याचे चांगभल झाले आहे.

तालूक्यात मागील काही महिन्यापासून महिन्यापासून अवैध धंदे बळकावले असून राजरोजपणे अवैध धंदेचालक पोलीस प्रशासनाला न घाबरता मटका बूकी चालवत आहेत.शहरात क्रांती चौक,मोंढा परीसर,बस स्थानक,रेल्वे स्टेशन,जिंतूर नाका,आठवडी बाजार,रायगड नाका,विद्यानगर आदी सह शहरात शंभर ठिकाणाहून अधीक ठिकाणी मटका बूकी सूरू आहेत.यामूळे शहरातील शांतता भंग होत आसून शहरासह ग्रामीण भागातील नागरीकांना मटका जूगाराचे व्यसन जूडले असल्याचे चित्र



दिसत आहे.याकडे मात्र पोलीस प्रशासन डोळझाक करत असल्याने मटका बूकी चालक बिनधास्तपणे कल्याण मूंबई नावाचा मटका जूगार चालवत आहेत.यामूळे अनेक कूटूंब उधवस्त होत असून हा मटका नावाचा जूगार बंद व्हावा अशी मागणी सूजान नागरीकातून होत आहे.

देशी बार मधून चढ्यादराने दारू विक्री शहरात तीन देशी दारू दूकाने तर एका वाईन शाँप मधून देशी दारूची अधिकृत दूकाने आहेत वाईन शाँप मधून देशी दारूची एक १८० मिली ची बाँटल ७० रूपयाला विक्री केली जाते तर इतर तीन देशी दारू दूकानातून मात्र १८० मिली ची बाँटल ७५ रूपये ला विक्री केली जात असून त्याासोबत ग्लाससाठी परत ५ रूपये असे मिळून ८० रूपये मद्यप्रेमींना मोजावे लागतात मद्यप्रेमींची देशी दारू दूकान चालक तब्बल १० रूपयाची लूट करत असून दारूबंदी अधिकारी मात्र सदरिल बाब गांभिर्याने घेत नसल्याचा आरोप मद्यप्रेमीतून होत आहे.सदरिल दूकानचलाकांना आवर घालण्याची मागणी मद्यप्रेमीतून होत आहे.

## पाण्यासाठी परभणी, मानवतचे शेतकरी आक्रमक

### जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन सादर

**परभणी,/प्रतिनिधी-** पाथरी विधानसभेतील परभणी व मानवत तालुक्यातील ६० गाव हे निम्न दुधना व जायकवाडी प्रकल्पा पासून वंचित आहेत. त्यामुळे या सर्व गावांना पाण्याचे नियोजन कारणच्या मागणीचे निवेदन जिलाधिकारी याच्या मार्फत २४ जुलै रोजी देण्यात आले आहे.



दरम्यान या बबिकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलचा ईशरा शेतकऱ्यांनी दिला आहे.

परभणी शहरातील अशा सर्व गाव गावच्या प्रमुख शेत कऱ्यांची बैठक हॉटेल जैन गार्डन, परभणी येथे पार पडली.

मानवत व परभणी तालुक्यांतील ६० गावाची बहुतांश शेतकरी हे कोरडवाहू शेती करत असल्याने शेतीचे उत्पादन अत्याल्प आहे. या शेकऱ्यांना कुठलाही नाय मिळाला नाही. पाण्या पासून वंचित सर्व गावच्या शेतकर्यांनी बैठकीत निर्णय केला की जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सरकारने तात्काळ म्हणजे ५ऑगस्ट पर्यंत काय करत आहेत ते कळवावे अन्यथा दिनांक ९ ऑगस्ट क्रांती दिनी शेतकरी आपल्या गुरांसह रस्त्याावर उतरून आंदोलन करत मागणी मार्गी लागेपर्यंत आंदोलन स्थगित करणार नाही असा इशारा शेतकऱ्यानी दिला आहे.

### पाणी मिळत नाही तोपर्यंत आंदोलन - सोळंके

**मानवत व परभणी तालुक्यातील काही गाव जायकवाडी व निम्न दुधना प्रकल्पा पासून वंचित शेतकरी आक्रमक झाला असून जो पर्यंत हक्काच पाणी मिळत नाही तो पर्यंत आंदोलन स्थगित नाहीच असे प्रतिपादन भाजपा किसान युवा मोर्चाचे सरचिटणीस रंगनाथ सोळंके यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.**

## शेवटपर्यंत जनतेचा सेवक म्हणून काम करणार- आ.डॉ.रत्नाकर गुट्टे

**पूर्णा,/प्रतिनिधी :** राज्यातील महायुतीचे सरकार जनसामान्यांच्या हिताचे निर्णय घेवून पारदर्शक काम करीत आहे. केवळ अर्थसंकल्पात नव्हे तर, मंत्रिमंडळ बैठकीत सुध्दा लोकहिताचे निर्णय घेवून विकासाचा अजेंडा अधिक सक्षम करीत आहे. त्याच सरकारच्या घटक पक्षाचा सदस्य म्हणून मला पर्यायाने आपल्या मतदारसंघाला सातत्याने भरघोस निधी मिळाला आहे. त्यातून अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत व भविष्यात सुध्दा हाच स्ट्राईक रेट सुरू राहील. कारण, विकासासाठी शेवटपर्यंत जनतेचा सेवक म्हणून काम करीत राहणार आहे, अशी ग्वाही गंगाखेड विधानसभेचे आ.डॉ.रताकर गुट्टे यांनी दिली.

शहरातील राजाराम बापू सभागृह येथे ३६२ बांधकाम कामगारांना आ.डॉ. गुट्टे यांच्या हस्ते गृहउपयोगी वस्तु संचाचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ आणि आ.डॉ.रताकर गुट्टे संचलित शासकीय योजना मदत केंद्राच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र परिश्रम करणारे कामगार जीव मुठीत घेवून काम करीत असतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यात मदत व्हावी, या हेतूने संसारोपयोगी साहित्या देण्याचा निर्णय अतिशय योग्य आहे. त्यामुळे कामगारांना आधार मिळत आहे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेत शासनाने इतरही योजना आणि निर्णय घेतले आहेत. परिणामी, इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळ आधार देणारी संस्था ठरत आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी म्हटले.

बांधकाम कामगारांच्या हितासाठी आयोजित या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्धेश्वर फड आणि सूत्रसंचालन रताकर सूर्यवंशी यांनी केले. तर आभार अभिजीत चक्के यांनी मानले. यावेळी मित्रमंडळाचे तालुकाध्यक्ष गणेश कदम, प्रभारी सुभाष देसाई, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गीतराम देसाई, सरपंच उत्तमराव ढोणे, युवक तालुकाध्यक्ष मारोती मोहिते, ऋषीकेश सकनुर, नाना अवरगंड, प्रशांत कापसे, बळीराम कदम, मारोती मोहिते महागावकर, इस्माईल शेख, दत्तराव पौळ, अस्लम पठाण, विश्वनाथ होळकर, बालाजी काळबाडे, रताकर सूर्यवंशी,पत्रकार यांच्यासह शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी, लाभार्थी, माता भगिनी व कामगार बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### पूर्णा येथे गृहपयोगी वस्तु वाटप : अनेक कामगारांना मिळाला लाभ



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विरोधक अर्थसंकल्पाबाबत फेक नरेटीव्ह पसरवत आहेत– प्रमोद वाकोडकर

## केंद्राने महाराष्ट्राला २०२४ च्या अर्थसंकल्पात भरीव निधी दिला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**

केंद्र सरकारने नुकताच सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला पायाभूत सुविधामध्ये रेल्वे प्रकल्प, मेट्रो प्रकल्प, औद्योगिक कॉरिडोर, इको फ्रेंडली शेती, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आणि शहरी, पाणीपुरवठा योजना, मुद्रा योजना, पीएम स्वनिधी, नदी पुनर्विकास प्रकल्प, ग्रामीण रस्ते, गृहनिर्माण, आरोग्यसेवा, वस्त्रोद्योग, ग्राम सडक योजना, रेल्वे उड्डाणपूल आदींसाठी हजारो कोटींचा निधी दिला आहे. देशाला विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने हे पाऊल असून विरोधकांकडे मुद्दे नसल्यामुळे आता केंद्राच्या अर्थसंकल्पाबाबत फेक नरेटिव्ह पसरवण्याचे काम करण्यात येत आहे परंतु महाराष्ट्राची जनता विरोधकांच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा विश्वास भाजपचे उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षाच्यावतीने केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पाबाबत माहीती देण्यासाठी तसेच विरोधकांच्या फेक नरेटिव्हला सडेतोड उत्तर देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजप उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, उद्योग आघाडीचे प्रदेश सदस्य मिलींद यंबल, प्रशांत सोनी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना वाकोडकर म्हणाले की, विरोधक भाजपच्या कोणत्याही योजनांबाबत सोशल मिडीयामधून फेक नरेटिव्ह तयार करून जनतेमध्ये पसरवत आहे. परंतु लोकसभा निवडणुकीनंतर जनतेने विरोधकांचे मनसुबे ओळखले असून यापुढे जनता विरोधकांच्या खोट्या प्रचाराला बळी पडणार नाही. फेक नरेटिव्ह एकदाच काम करतो. केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काही मिळाले नाही असा खोटा प्रचार सोशल मिडीयामधून केला जात आहे परंतु वास्तविक केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला पायाभूत सुविधांसह शेती, उद्योग, रस्ते, वीज, रेल्वे आदींसाठी हजारो कोटींचा निधी मिळाला आहे. त्यामध्ये रेल्वे प्रकल्पासाठी १५९४० कोटी मंजूर करण्यात आले आहेत. काँग्रेसच्या काळात केवळ ११७१ कोटी मिळाले होते. शिवाय १२८ रेल्वे स्थानकांचे अमृत भारत योजनेत काम सुरू आहे. मुंबईतील प्रवाशांसाठी २५० नवीन लोकल तर १०० मेल एक्सप्रेस येत्या पाच वर्षात सुरू करण्यात येणार आहेत. मेट्रो प्रकल्पासाठी २५ हजार कोटींची तरतुद करण्यात आली आहे. औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी दिल्ली–मुंबई कॉरीडोर साठी ४९९ कोटींची तरतूद, मुंबई नागरी वाहतुक प्रकल्पासाठी ९०८ कोटी, वाधवान बंदर प्रकल्पासाठी ७६ हजार २२० कोटी रूपयांची तरतूद आणि २० हजार नोकऱ्यांची निर्मीती होणार आहे. नदी पुनर्विकास प्रकल्पासाठी ११९० कोटींची तरतुद करण्यात आली असून त्यामध्ये नाग नदी पुनर्विकास, मुळा मुठा नदी पुनर्विकास होणार आहे. ग्रामीण रस्त्यांसाठी ४ हजार १३३ कोटींची तरतुद करण्यात आली असून शहरी भागात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १३ लाख कुटंबांना घरकुलांसाठी २५ हजार ५४८ रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. लसीकरण कार्यक्रम, पोषण अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, नवीन वैद्यकीय महाविद्यालये यासाठी ४ हजार ८०० कोटीपेक्षा जास्त निधींची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १३ लाख कुटंबांना घरकुलांसाठी १९ हजार ५७७ रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय पीएम स्वनिधी १३११ कोटी, मुद्रा योजनेसाठी ४३ हजार ७५ कोटी, अमरावती येथे टेक्सटाईल पार्कच्या माध्यमातून २० हजार नोकऱ्यांची निर्मिती, पंतप्रधान ग्राम सडक योजनेसाठी ११ हजार १४५ कोटी, रेल्वे प्रकल्पासाठी ८१ हजार ५८० कोटींच्या गुंतवणूकीसह २१ चालू प्रकल्प आणि ५८७७ किमी नवीन ट्रॅकचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न पुर्ण करण्याच्या दिशेने आज भारत देश जात असतांना विरोधकांना पोटशुळ उठले असल्याची टीका यावेळी वाकोडकर यांनी केली.

# हिंगोलीत आंदोलनातूनही काँग्रेसमधील गटबाजी चव्हाट्यावर

## गोरेगावकर यांच्या गटाने पाठ फिरवली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**

काँग्रेसचे नेते खा. राहुल गांधी यांना जात विचारल्याच्या निषेधार्थ येथील गांधी चौकात काँग्रेसच्यावतीने खा अनुराग ठाकूर यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले परंतु या आंदोलनात काँग्रेसमधील गटबाजी पुन्हा चव्हाट्यावर आली असून माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि त्यांच्या समर्थकांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले.

काँग्रेसचे नेते खा राहुल गांधी यांना जात विचारल्याच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाच्यावतीने राज्यात भाजपचे खा अनुराग ठाकूर यांच्या विरोधात आंदोलन करीत निषेध करण्यात आला. हिंगोलीत दि २ ऑगस्ट रोजी विधानपरिषद सदस्या आ. डॉ. प्रज्ञा सातव यांच्या नेतृत्वात अनुराग ठाकूर यांच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन करीत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई,तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भागवत चव्हाण, माजी शहराध्यक्ष बापुराव बांगर, माजी तालुकाध्यक्ष प्रकाश थोरात, गजानन देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश सराफ, माजी नगराध्यक्ष सुधिर सराफ, माजी तालुकाध्यक्ष विनायकराव देशमुख, कृउबा संचालक शामराव जगताप, जिल्हा काँग्रेस प्रवक्ता विलास गोरे, माजी नगरसेवक अनिल नेनवाणी, माबुद बागवान, बासीत मौलाना, एनएसयुआय जिल्हाध्यक्ष जुबेर मामु, बंटी नागरे, औंढा तालुकाध्यक्ष पंकज जाधव, आदीवासी काँग्रेससेलचे अध्यक्ष गजानन ढाकरे,पंजाबराव गडदे, सेवादल अध्यक्ष सुदाम खंदारे, कैलाश चव्हाण, संजय राठोड, अतुल घुगे, गुणाजी बोडखे, विलास बेंगाळ, शेख इसराईल, बापुराव मगर, मुजीब कुरेशी, उमाकांत शेवाळकर, आरेफ लाला, अशोक दांडेकर यांच्यासह जिल्ह्यातील काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र या आंदोलनाकडे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि त्यांच्या समर्थकांनी पाठ फिरवली.

काही दिवसांपूर्वी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी गोरेगाव येथे शेतकरी प्रश्नांवर मेळावा घेतला होता. त्यावेळी आ. डॉ प्रज्ञा सातव यांनीही या मेळाव्याकडे पाठ फिरवली होती. जिल्ह्यातील काँग्रेसमधील गटबाजी चव्हाट्यावर आली आहे.



**हिंगोली– भारतीय जनता पक्षाच्यावतीने शुक्रवारी बुध्दीजीवींचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी वकील, डॉक्टर्स, प्रतिष्ठित व्यापारी, शिक्षक आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करतांना भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, युवाजिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण आदींची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

# सुकळीवळण येथील प्रकरणाची सखोल चौकशी करा– आ. सातव


**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**



कळमनुरी तालुक्यातील सुकळीवळण येथील तरूण शेतकरी कृष्णा चंद्रवंशी यांनी आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्यांच्या कुटुंबियांवर अन्याय करणाऱ्या अधिकारी व इतरांची नावे घेतली असून या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करावी तसेच चंद्रवंशी कुटुंबियांना २५ लाख रूपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांना सादर केलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

कळमनुरी तालुक्यातील सुकळीवळण येथील शेतकरी कृष्णा चंद्रवंशी यांच्या कुटुंबाची जमीन इसापूर धरणासाठी संपादीत करण्यात आली होती. सदर जमीन गाळपेऱ्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी चंद्रवंशी कुटुंबियांनी केली होती. परंतु प्रशासनाने त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले तर मंडळ अधिकारी यांनी जमीन ताब्यात घेतल्याचा आरोप आत्महत्या करण्यापूर्वी कृष्णा चंद्रवंशी यांनी केला होता. महसुल प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष का करण्यात आले, असा सवाल करीत या प्रकरणाची वरिष्ट अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करून अहवाल सात दिवसात जाहीर करावा. दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच चंद्रवंशी कुटुंबियांना २५ लाख रूपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर आ. डॉ प्रज्ञा सातव यांच्यासह काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत जागतिक हिपॅटायटीस दिनानिमित्त जनजागृती रॅली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत येथील नर्सींग महाविद्यालय, जिल्हासामान्य रूग्णालयाच्यावतीने जागतिक हिपॅटायटीस पंधरवाड्यानिमित्त जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

जागतिक हिपॅटायटीस पंधरवाड्यानिमित्त जिल्ह्यात ३२ उपचार केंद्र तर ४ आदर्श उपचार केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यानिमित्त दि २२ जुलै ते ३ ऑगस्टपर्यंत पंधरवाडा साजरा करण्यात येत असून यामध्ये हिपॅटायटीस रूग्णांची तपासणी आणि औषधोपचार करण्यात येत आहेत. यानिमित्त नर्सींग महाविद्यालयात प्रशिक्षण घेत असलेल्या ९० जणांसह रूग्णालयातील अधिकारी, कर्मचारी यांची हिपॅटायटीस बी ॲन्ड सी ची तपासणी करण्यात आली. यावेळी नर्सींग महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीनी जनजागृती रॅली काढली. या रॅलीला जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ दिपक मोरे यांनी हिरवी झेंडी दाखवली. यावेळी चिंचकर, आशा क्षीरसागर, कुलदीपक कांबळे, ज्ञानेश्वर चौधरी, सोळंके आदींची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील मुख्य मार्गावरून रॅली काढण्यात आली. शिबीर यशस्वीतेसाठी लक्ष्मण गाभणे, व्ही एस आंबटवार यांच्यासह कर्मचारी, अधिपरिचारीका यांनी परिश्रम घेतले. नागरिकांनी हिपॅटायटीस ची नियमित तपासणी करावी तसेच आजाराचे लसीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ तडस यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### कृउबा समितीमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



वसमत– कृषी उत्पन्न बाजार समिती येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली व ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सभापती तानाजी बेंडे, उपसभापती सचिन भोसले, राजू चापके, विनोद झंवर, लक्ष्मीकांत मुरक्या, सतीश कुसळे, अमजद पठाण यांच्यासह दीपक लोंढे मारुती कांबळे, मुजीब पठाण, नागन लोंढे, सिताराम सोनटक्के, रंगनाथ पारधे, दत्तराव जाधव, गंगाधर गायकवाड, रंगनाथ घोडे, ज्ञानेश्वर भुजबळे, राजेंद्र धबडगे, अनिल गायकवाड, एकनाथ मोहिते, पांडुरंग बसवंते, नागेश गायकवाड, शिवा गायकवाड, राजू गायकवाड सर्व पक्षातील मान्यवर मंडळ, व्यापारी, हमाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सीसीआयचा कापूस खरेदी दर ७५२१ रूपये

हिंगोली– सीसीआय (शासकीय) कापूस खरेदीचा दर २०२४–२५ या हंगामाकरीता ७५२१ रुपये क्विंटल ठेवला आहे. परंतु त्यासाठी शासनाच्या अटींची पूर्तता शेतक–याने करावी, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे.'सीसीआय' शेतकऱ्यांनी कापूस दिला तर त्याचे वेळेवर खात्यात पडतात. त्यासाठी शासनाने घालून दिलेल्या अटींची पूर्तता करायला पाहिजे. गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी शासनाने काही अटी घातल्या असून त्याची पूर्तता २०२४–२५ या वर्षात शेतकऱ्यांनी करुन आपला कापूस 'सीसीआय' कडे द्यावा, असे आवाहनही कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे. ज्या शेतकऱ्यांनी कापसाची ई–पीक पाहणी केली नसेल त्यांनी ती करुन घ्यावी. सातबारावर कापसाची नोंद नसेल तर ती करुन घ्यावी. बँकेला आधारकार्ड तसेच मोबाईल नंबर लिंक करणे आवश्यक आहे. तरच बँकेच्या खात्यात पैसा वेळेवर पडेल. 'सीसीआय' ने कापूस खरेदीचे दर निश्चित केले असून २०२४–२५ हंगामाकरीता ७५२१ रुपये क्विंटलप्रमाणे भाव मिळेल, अशी माहीती कृउबाचे सचिव नारायण पाटील यांनी दिली आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती

हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे, नायब तहसीलदार डी. एस. जोशी, बोथीकर आदींची उपस्थिती होती.

# देवराव कारगुडे यांचा नायब तहसीलदारपदी पदोन्नतीबद्दल सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**

सेनगाव तहसील कार्यालयात अव्वल कारकून देवराव कारगुडे यांची सेवा जेष्ठता यादीनुसार नायब तहसीलदार महसूल २ पदी पदोन्नती झाल्याने त्यांचा सेनगाव तहसील कार्यालयात तहसीलदार सखाराम मांडवगडे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

नुकत्याच संभाजीनगर विभागीय आयुक्त अंतर्गत असलेल्या सेवा जेष्ठता यादीनुसार एकूण ३७ अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांना नायब तहसीलदार पदी पदोन्नती देण्यात आल्याचे राज्य सरकारकडून परिपत्रक जारी करण्यात आले. त्यामध्ये तहसील कार्यालयात पुरवठा विभागा कार्यरत असलेले अव्वल कारकून देवराव कारगुडे यांची सेनगाव तहसील कार्यालयात नायब तहसीलदार महसूल २ पदोन्नती झाल्याने त्यांचा सेनगाव तहसील कार्यालयात तहसीलदार सखाराम मांडवगडे, नायब तहसीलदार दिलीप गायकवाड, नायब तहसीलदार अनिल सरोदे, विनोद अंभोरे, तुकाराम जाधव, दिलीप कदम, मीना मारशेट्टीवार, अशोक देशमुख, प्रवीण रणवीर, लिपिक काळे, शिवाजी देशमुख, मधुकर देशमुख, देविदास गाडे, भागवत पाटील आदींची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे काढण्यास होणाऱ्या विलंबावर तोडगा काढण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**

उच्च शिक्षण तसेच वैद्यकीय, अभियंता आणि इतर ठिकाणी प्रवेश घेण्याची प्रक्रीया सध्या राज्यात सुरू आहे परंतु प्रमाणपत्रे काढण्यासाठीचे सर्वर डाऊन असल्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्रे उपलब्ध होत नसल्यामुळे यावर मुख्यमंत्र्यांनी तोडगा काढावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते कौसर पठाण यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे.

सध्या राज्यभरात वैद्यकीय, इंजिनीअरिंग तसेच इतर शिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रे ऑनलाईल काढावी लागत आहेत. त्यामध्ये नॉनक्रेमिलेअर, जातीचे प्रमाणपत्र, रहीवाशी प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र आदींचा समावेश आहे. परंतु हिंगोली तहसील कार्यालयात सर्वर डाऊन असल्यामुळे प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना अजूनही मिळत नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होण्याची भिती नाकारता येत नाही. यासाठी मुख्यमंत्र्यांनी यावर तोडगा काढावा किंवा सर्वर सुरळीत करावे जेणेकरून विद्यार्थी, पालक यांना सहजपणे प्रमाणपत्रे उपलब्ध होतील. निवेदनावर कौसर पठाण, मंगेश नरवाडे, संघरक्षित कांबळे, अविनाश जाधव, शंकर इंगोले, शत्रुघ्न भोस, शिवशंकर झुंगरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अण्णाभाऊ साठे जयंती, लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ ऑगस्ट**



स्मृतीशेष अँड. ग्यानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थेच्या राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय हिंगोली येथे महाराष्ट्राच्या संयुक्त चळवळीमध् ये मोलाचे योगदान देणारे अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपन्न करण्यात आली. तसेच भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व व्याख्याता म्हणून डॉ. किशोर इंगोले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य उमेश शेळके यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील गौतमी नरवाडे व संजना पाचपुते विद्यार्थिनी केले डॉ. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा डी डी शिरसाट यांनी केले. नूतन मोरे व आरती चव्हाण या विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन डॉकिशोर इंगोले यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनामधील संकटे, अडीअडचणी यावरती कशा पद्धतीने मात केली. आजच्या नवीन पिढी मधील विद्यार्थ्यांमध्ये आलेला न्यूनगंड शिक्षणाचा अभाव वाचनाचा अभाव यामधील तफावत कशी दूर करता येईल यावर त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिवशंकर डोलारे यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# लोहा-कंधारमध्ये माजी खा. चिखलकर यांचा वाढदिवसानिमित्त अभूतपूर्व गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, २ ऑगस्ट -**

पाच वर्षा पूर्वी ज्यांना निवडून आणण्यासाठी. जिवापाड प्रयत्न केले. त्याच कार्यकर्त्यांवर या पाच वर्षात त्या कारणाने पोलीस गुन्हे दाखल करायला लावले. पाच वर्षाचा राजकीय वनवास' संपणार. एकजुटीने...,एकमतानं.., एक विचारानं प्रतापरावाच्या पाठीशी आपण उभे आहोत. सामान्य... जनताही आपल्या हक्काच्या माणसासाठी खंबीरपणे साथ देणार असे आवासक चित्र वाढदिवसाच्यानिमिताने दिसले. अभूतपूर्व. अविस्मरणीय स्वागताच्या अलोट गर्दीने हे दाखवून दिले. लोहा- कंधार तालुक्याने आपल्या लाडक्या नेत्यावर गुलाब,पुष्प व शुभेच्छाचा वर्षाव करत येत्या निवडणूकीत प्रतापरावां शिवाय पर्याय नाही असाच ठोस संदेश दिला आहे.



लोहा तालुक्यात व शहरात नियोजित मार्गावर जिल्ह्याचे नेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसा निमित्ताने जागोजागी.. गावोगावी..तसेच ..शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी कार्यकर्ते- पदाधिकारी -व्यापारी- सामान्य नागरिक- मजूरदार यांनी मोठ्या आस्थेवाईकपणे जिल्ह्याचे नेते प्रतापराव पाटील यांचा वाढदिवस साजरा केला सकाळी साई सुभाष नांदेड येथून सकाळी सहा वाजता प्रतापराव पाटील -सिडको -किवळा कलंबर -सोनखेड -पारडी-लोहा-मार्गे धावरी फाटा-किरोडा-गोलेगाव पाटी-मार्गे कंधार असे त्याचे आगमन झाले लोह्यात यायला त्यांना दुपारी साडे तीन वाजले .

**वाजतगाजत गावोगावी**

त्यांचे स्वागत.. औक्षण, फटक्याचीअतिषबाजी ,क्रेन ने भला मोठा पुष्पहार, ग्रंथतुला, असे विविध उपक्रम राबविले. जल्लोष... अविस्मणीय... वातावरण होते. बरोबर बाराच्या ठोक्याला साई सुभाष कार्यकर्त्यांनी ..अलोट प्रेम करणाऱ्या चाहत्यांनी फुलून गेले होते .सुविद्य पत्नी प्रतिभाताई , कन्या चिरंजीव, स्नुषा, नातवंडे, कुटुंबीय याच्या उपस्थितीत रात्रीच वाढदिवस साजरा झाला.

**प्रतापराव वाढदिवस अभिष्टचिंतन शुभेच्छाचा वर्षाव झाला**

आपला हक्काचा माणूस ही ओळख या निमित्ताने अधिक घट्ट झाली. सामान्य माणसाच्याअडीअडचणी जाणून त्या तळमळीने सोडविणारे प्रतापराव पाटील यांच्या सारखे आमदारअसणे मतदार संघाची गरज आहे असा उत्स्फूर्त प्रतिक्रिया उमटल्या .छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्या नंतर जागोजागी त्याचे शहरात जंगी स्वागत झाले .क्रांतिसूर्य बुद्ध विहारात त्यांनी तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले . जिल्हाध्यक्ष देशमुख, आनंदराव शिंदे, माणिकराव मुकदम, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, दता वाले केशवराव मुकदम, संजय पाटील कऱ्हाळे, छत्रपती धुतमल ,हरिभाऊ चव्हाण, बालाजी खिल्लारे, करीम शेख दीपक पाटील कानवटे, सचिन मुकदम, नरेंद्र गायकवाड, नाना घंटे, राम पाटील कारेगाव, पत्रकार हरिहर धुतमल, गोविंद कदम, शेख मुर्तुज,जगदीश कदम, इमाम लदाफ, शिवाजी पांचाळ, फेरोज मणियार, प्रवीण धुतमल, सूर्यकांत गायकवाड, शहाजी पवार ,तुकाराम सुरनर, नामदेव बुद्धे, सतीश निखाते , बालाजी कळसकर, अनिल धुतमल,भास्कर पाटील, शोभाताई बगडे, संजय मोटे पाटील, सोनी क्लॉथ सेंटर,शेख सिकंदर, दता शेटे ,टी के दाढेल यासह असंख्य चाहत्यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने सत्कार केला.

## संक्षिप्त वृत्त



### स्व: खर्चातुन वृक्षलावगड

**हदगाव -** तालुक्यातील भानेगाव तांडा येथिल ग्राम पंचायत सदस्य तथा समाज कामात सदैव अग्रेसर राहणारे गोर सीकवाडी या सामाजिक चळवळीचे हदगाव तालुका संयोजक अजयकुमार चव्हाण यांच्या संकल्पनेतून काही महिन्यांपासून हदगाव तालुक्यात राबवण्यात येणाऱ्या वृक्षलाडवड या चळवळी ला चांगला प्रतिसाद मिळत आहे. तरुण वर्गात झाडांचे महत्त्व व निसर्गाविषयी जनजागृती करून प्रत्यक वाढदिवसाला किमान दोन तरी वृक्षलावगड करण्यात यावी ही संकल्पना रुजवण्यात येत आहे आणि त्याचे फलित म्हणून आता पर्यंत ५०० पेक्षा जास्त वृक्षांची लागवड गावोगावी कण्यात आले आहे. आज हदगाव भानेगाव तांडा रोड वर स्वयं खर्चातून ७०० वृक्षलवगड करण्यात आले असून या आठवड्यात किमान २००० वक्षलावगड करण्यात येणार आहे असे अजय चव्हाण यांनी सांगितले. वक्षलावगडीचे काम पाहण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन प्रशासनाकडून जमेल ती मदत देण्याचे आश्वासन दिले आहे.

### डॉ.अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी बाळासाहेब टिकेकर

**भोकर -** सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी बाळासाहेब टिकेकर तर सचिव पदी सखाराम वाघमारे यांची सर्वानूमते निवड करण्यात आली. दि. १ आँगष्ट रोजी भोकर येथील लहूजी चौकात जेष्ठ समाजसेवक माहूरकर अण्णा यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती मंडळाची बैठक पार पडली असून बाळासाहेब टिकेकर यांची जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी तर सखाराम वाघमारे यांची सर्वानूमते निवड करण्यात आली कार्यकारिणी पूढिल प्रमाणे उपाध्यक्ष ओमश्री मोरे,पार्वतीबाई बरकंबे, सहसचिव महेंद्र किनीकर, कोषाध्यक्ष बालाजी काळे, संतोषअण्णा सूर्यवंशी, आदिची निवड करण्यात आली यावेळी के. वाय. देवकांबळे, दिलीप वाघमारे सखाराम मोरे सह लसाकमचे पदाधिकारी कर्मचारी सामाजबांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### बिलोली आण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहात साजरी

**बिलोली -** साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त तालुक्यात व बिलोली शहरात प्रशासकीय कार्यालयासह विविध ठीकाणी मोठ्या उत्साहात अभिवादन करण्यात आले आहे. दि.१ आगस्ट रोजी साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती बिलोली शहरात अण्णाभाऊ साठे नगर,देशमूख नगर,नगर परीषद वाचनालय,टो युनियन व विविध ठीकाणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. तद्नंतर गत वर्षा प्रमाणे याही वर्षी सर्व पत्रकारांच्या वतीने तहसिल कार्यालया समोर घेण्यात आलेल्या अभिवादन सोहळ्यात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन जेष्ठ पत्रकार अशोक दगडे व प्रकाश पोवाडे यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यासमयी पत्रकार राजेंद्र कांबळे, गंगाधर कूडके,माधव एडके, यादव लोकडे, साईनाथ शिरोळे,गौतम लंके, दिलीप घाटे, पि.जी. गायकवाड,बालाजी यलगद्रे, मार्तंड जेठे, नागेश माचापुरे, वाघमारे, शंकर बोडके, बाबु कुडकेसह तालूक्यातील विविध पक्षाचे पदाधिकारी, सामाजीक कार्यकर्त्यांसह बहूसंख्य नागरीकांची उपस्थीती होती.

### मुदखेड शहरात विविध ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**मुदखेड -** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती शहरात व तालुक्यात विविध ठिकाणी साजरी करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी त्यांच्या फलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी सहायक पोलीस निरीक्षक बी.आर. कांबळे, सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, डीएसबी चे किशोर पाटील,यांची उपस्थिती होती. शहरातील वीरशैव गवळी समाज सभागृहात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून अभिवादन करण्यात आले यावेळी संजय आऊलवार, उत्तम चव्हाण,प्रवीण काचावार, चांदु बोकेफोड, यासह आदी उपस्थित होते. तसेच कॉंग्रेस पक्ष कार्यालयात तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास अण्णा गोडसे, यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महंमद गौस, सूर्यकांत चौदंते, मुजीब पठाण, अविनाश चौदंते, आकाश सोनटक्के,यासह आदी कॉंग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

### थडीसावळी ग्रामपंचायतच्यावतीने डॉ. अण्णाभाऊ साठेंची जयंती साजरी

**बिलोली -** बिलोली तालुक्यातील थडीसावळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती दि.१ ऑगस्ट २०२४ गुरूवार रोजी साजरी करण्यात आली.

# नांदेड उत्तर विधानसभेसाठी महेश देशमुखांची कॉंग्रेसकडून दावेदारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २ ऑगस्ट -**



आगामी विधानसभा निवडणुकीत नांदेड उत्तर मतदारसंघामध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसकडून आपल्याला उमेदवारी द्यावी अशी मागणी पक्षाचे नांदेड शहर जिल्हा कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर यांनी आज पक्षाकडे केली आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी च्यावतिने मतदारसंघनिहाय ईच्छूकांकडून अर्ज मागणी सुरु असल्याने आज नांदेड जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या कार्यालयात पक्षाचे जिल्हाध्यक्ष बि.आर.कदम यांच्याकडे शहर जिल्हा कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर यांनी आपला मागणी अर्ज दिला आहे.यावेळी नांदेड दक्षिणचे आ.मोहन हंबर्डे,शहर जिल्हाध्यक्ष अब्दुल सत्तार,माजी उपमहापौर आनंद चव्हाण, अब्दुल गफार,आनंद कल्याणकर,बालाजी चव्हाण,अनु. जाती सेलचे जिल्हाध्यक्ष सुरेश हटकर, सत्यपाल सावंत,युवकचे शंकर शिंदे,दिपक हुजुरिया आदींची प्रमुख उपस्थिती होती.

महेश देशमुख हे विद्यार्थी चळवळीपासून युवक कॉंग्रेसच्या माध्यमातून कॉंग्रेस पक्षाशी जोडले गेलेले असून समाजकारणातून राजकीय वाटचालीला त्यांचे प्राधान्य आहे.नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत नांदेडमधून कॉंग्रेसचे नवनिर्वाचित खासदार वसंतराव पाटील चव्हाण यांच्या विजयात योगदान देत त्यांनी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातून आपल्या तरोडा (बु.) या मूळ गांवासह शहरी व ग्रामीण भागात मोठे मताधिक्य मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.कॉंग्रेससह महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांशी व या भागातील सर्व समाजघटकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध असून त्यांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी केल्याने ते या मतदारसंघात प्रबळ दावेदार ठरु शकतात. तसेच,देशमुख यांना संधी दिल्यास आगामी विधानसभा निवडणूकीत या ठिकाणी कॉंग्रेसला नक्कीच विजयाची संधी राहील असा स्थानिक मतदार व जनतेसह विश्लेषकांचा सूर आहे.

# सोयाबीन, कापसाचे अनुदान सर्वच शेतकऱ्यांना द्या : कलंबरकर

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद, २ ऑगस्ट -**

२०२३ मध्ये कापूस-सोयाबीन पिकाचे भाव खुप कमी होते.म्हणून सरकार कमी भावात विकलेल्या सोयाबीन-कापूस पिकासाठी हेक्टरी ५००० रु. अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. पण हे अनुदान देताना ई-पिक पाहणी अँप/ पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनाच हे अनुदान देणार आहे.या अटीमुळे खुप मोठ्या प्रमाणामध्ये शेतकरी या अनुदानापासून वंचित राहणार आहेत.या अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनीसुद्धा सोयाबीन-कापूस बाजारामध्ये कमी भावानेच विकलेला आहे.तरीपण या शेतकऱ्यांना या अटीमुळे अनुदानाचा लाभ मिळणार नाही.मग सरकारचा नेमका उद्देश काय? सोयाबीन-कापूस लागवड केलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला या अनुदानाचा लाभ मिळाला पाहिजे.यासाठी ई-पिक पाहणी अँपवरील नोंदणीची अट रद्द करा अशी मागणी कृषीमंत्र्याकडे तहसीलदार राजेश जाधव यांच्यामार्फत स्वाभिमानीचे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी दिनांक ३१ जुलै रोजी केली आहे.

सोयाबीन-कापूस लागवड केलेल्या प्रत्येक शेतकऱ्यांला हे अनुदान मिळाले तरच योजनेचा उद्देश साध्य होणार आहे.दरवेळी सरकार शेतकऱ्यांसाठी योजना आणत असताना अटी लावून जास्तीच्या शेतकऱ्यांना योजनेपासून वगळत आहे.हा शेतकऱ्यांवर खुप मोठा अन्याय आहे.

# अर्धापूर नगर पंचायत प्रशासनाला दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर, २ ऑगस्ट -**

दिनांक ५ ऑगस्ट २०२४ पासून हिंदू धर्मीयांचा पवित्र श्रावण महिना सुरू होत आहे. अर्धापूर शहरातील नगर पंचायत हद्दीतील सर्व महादेव मंदिर परिसरात साफसफाई व लाईट बसविणे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.या मागणीचे निवेदन बुधवारी (ता.३१) अर्धापूर नगर पंचायतीच्या कार्यालयीन अधिक्षक अंकिता टिकार यांना देण्यात आले.



श्रावण महिन्यात दररोज पहाटे पासून ते रात्री पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात. शहरात बरेच महादेव मंदिर आहेत. त्या महादेव मंदिर परिसरात साफसफाई व लाईट बसविणे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे या मागणीचे निवेदन नगर पंचायत प्रशासनाला अर्धापूर शहरातील शिवभक्तांनी दिले आहे.

या निवेदनावर लक्ष्मीकांत मुळे गुरू, अर्धापूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष गुणवंत विरकर, विष्णू टायकुटे, गजानन मेटकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव उमरी मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, २ ऑगस्ट -**

कै.गिरीषभाऊ देशमुख गोरठेकर यांच्या सांस्कृतिक सभागृह उमरी येथे भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर यांच्या अध्यक्षतेखाली मातंग समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली असून डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या सार्वजनिक जयंती मंडळ उमरीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्ष पदी अभिजित रामदास गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली आहे तर उपाध्यक्ष शंकर आनंदा शेळके, विनोद नामदेव शेळके, सचिव बाळु संभाजी शेळके, सहसचिव भगवान दिगांबर वाघमारे, कोषाध्यक्ष रवि सुरेश गायकवाड, सहकोषाध्यक्ष अतिश शिवाजी गायकवाड इत्यादींची निवड करण्यात आली असून सदर बैठकीत इरबाजी शेळके नगरसेवक, प्रकाश तुमकुंटे, प्रा पि एन धसाडे, डि एम कांबळे, बि एन डोंगरे, किशन इंगळे, शिवाजी शेळके, रविंद्र गायकवाड कुदळेकर, राजेश्वर सवई, चंद्रकांत गायकवाड, दिगांबर इंगळे, संतोष हैबतकर, संजय गायकवाड, संतोष शेळके, माधव गायकवाड, ज्ञानेश्वर शेळके आदी समाज बांधव उपस्थित होते.



**किनवट: साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जयंती सोहळा उत्साहात साजरा झाला असून या निमित्त अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ आयोजित अभिवादनचा कार्यक्रम संपल्या नंतर आ भीमराव केराम यांनी तेथे उपस्थित असलेले मातंग समाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते अजय मंत्रिवार यांचा चिमुकला चि.स्वराज्य यास या अण्णाभाऊ! आज समाजाला तुमची गरज आहे..! असे म्हणत लाडीवाळपणे उचलून घेत सर्वांचेच लक्ष वेधले.यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा डॉ राजकुमार मस्के, तरुण भारत पेपरचे तालुका प्रतिनिधी मधुकर अनेलवार उपस्थित होते.**

# बहुजन समाज पार्टीने टिकीट दिल्यास नायगाव विधानसभा मतदारसंघाची निवडणूक लढविणार : गंगाधर सवई

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, २ ऑगस्ट -**

उमरी तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा पत्रकार गंगाधरराव माणिकराव सवई यांनी दै, तरूण भारत प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे पुढे म्हणाले की.गेल्या चाळीस वर्षे पूर्ण झाली आहे राजकीय क्षेत्रातील काम करत असुन.खुप मोठा अनुभव मिळाला आहे सुरुवात भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष ते बहुजन समाज पार्टी अशी पक्षाचे कामं केले आहे.



नामांतर लढ्यात अनेक खेडेगावात दलित समाजातील लोकांनवर झालेल्या अन्याय अत्याचार विरोधात शाषन दरबारात लढा दिला.अनेक ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव साजरा होऊ नये म्हणून कटकारस्थान करणाऱ्या लोकांविरुद्ध खटले दाखल केले.आजही कांहीं ठिकाणीं दलित समाजातील लोकांनवर अत्याचार चालू आहेत.भहिषकार टाकुन समाजात तेढ निर्माण केला असता अशाही ठिकाणी जाऊन त्या समाजाला धिर देत खंबीर पणे पाठिंबा दिला.वेळप्रंसगी जेलमध्ये सुध्दा गेलोय परंतु माघार घेतली नाही.सध्या नायगाव विधानसभा मतदारसंघ निवडणुकांतील बरेच जण निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले जाते आपण ही निवडणूक लढाव असं विचार केला आणि बहुजन समाज पार्टी कडे टिकिट मागीतले आहे.जर पक्षाने संधी दिल्यास नक्कीच नायगाव विधानसभा निवडणुकीत उभे राहू.या वेळेस धनशक्ती विरुद्ध जनशक्ती सगळ्यांचा प्रसाद घेतला तरी मतदान कोणाला करतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या पक्षाकडे एकमेव आपणच मागणी केली आहे. नक्कीच पक्ष विचार करेल अशी अपेक्षा आहे.

# आनंदराव बोंढारकर यांचा पुढील वाढदिवस आमदार म्हणून साजरा करू : आनंदराव जाधव

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, २ ऑगस्ट -**

दक्षिण मतदार संघातील मातोश्री मंगल कार्यालय कवठा येथे घेण्यात आलेल्या अभिष्टचिंतन सोहळा दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी पार्क पार पडला यावेळी आनंदा जाधव यांनी आपले मत मांडताना

राजकीय कसलेही वलय नसलेले व ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून जन्मास आलेल्या आनंदराव पाटील बोंढारकर यांनी शिवसेना उपनेते माजी खासदार हेमंत भाऊ पाटील यांच्या आशीर्वादामुळे आणि पाठबळामुळे शाखाप्रमुख ते जिल्हाप्रमुख पदापर्यंत पोहोचले आहेत . आगामी काळात जनतेच्या आणि हेमंत भाऊ पाटील यांच्याच पाठबळावर आणि आशीर्वादावर बोंढारकर यांचा पुढचा वाढदिवस आपण आमदार म्हणून साजरा करण्याचा ठाम निश्चय शिवसेना संपर्कप्रमुख आनंद जाधव व माजी खासदार हेमंत पाटील यांनी विश्वास दर्शवले आहे.

नांदेड दक्षिणचे शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे उद्घाटक माजी खासदार हेमंत पाटील, अध्यक्ष संजय मोरे, प्रमुख उपस्थिती आनंद जाधव यांच्या उपस्थितीत दिनांक १ ऑगस्ट रोजी मातोश्री मंगल कार्यालय कौठा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला . यावेळी शुभेच्छापर आशिर्वाद देताना

शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कप्रमुख आनंदराव जाधव यांनी भाग्य आपणास मिळेल, यासाठी आपण सर्वजण बोंढारकर यांच्या पाठीशी उभे रहावे असे प्रतिपादन केले.यावेळी अभिष्टचिंतन सोहळ्यास माजी खासदार हेमंत पाटील ,माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर , नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर, शिवसेना महिला जिल्हा संपर्कप्रमुख रत्नमाला ताई मुंडे,जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, भाजपाचे महानगर अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते , मिलिंद देशमुख, संजय घोगरे, बसवते , शिवसेनेचे निरीक्षक दिलीप शिंदे, माजी नगरसेवक किशोरी यादव , सह संपर्कप्रमुख दर्शन सिंघ सिद्धू यांच्यासह शिवसेनेचे सर्व उपजिल्हाप्रमुख,तालुकाप्रमुख, शहरप्रमुख यांच्यासह आदी शिवसेना युवासेना, महिला आघाडी व अधिकृत संघटनेचे जिल्ह्यांतील सर्व पदाधिकारी आदींची उपस्थिती होती. बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर महिला व मुलींसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली .सकाळी अकरा वाजता रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या कीर्तनाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला. या कीर्तन सोहळ्यातही बोंढारकर यांचे



चाहते भक्तीरसात भाहून निघाले. त्यानंतर शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्क प्रमुख आनंदराव जाधव, दिलीप शिंदे, माजी खासदार हेमंत पाटील, माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत यांचा अभिष्टचिंतन सोहळा रंगला. भिज पावसात हजारो चहात्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला तर वडीलधाऱ्यांनी आशीर्वाद दिला. यावेळी आनंदराव बोंढारकर भावनीक होऊन आतापर्यंत ज्या पद्धतीने आपले लेकरू म्हणून तुम्ही मला सांभाळून घेतलात. भविष्यातही आपल्या कुटुंबातील छोटा भाऊ, मुलगा म्हणून मला पाठबळ द्याल, सहकार्य कराल, आशीर्वाद द्याल अशा शब्दात बोंढारकर यांनी उपस्थितांच्या काळजात जनु हातच घातला व सर्व दक्षिण मतदार संघातील उपस्थितांना भावनिक करून अपेक्षा व्यक्त केले.